# छात्र प्रबोधन

वर्ष ५ अंक ७
सौर माघ शके १९१८




ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक!

स्वा. विनायक दामोदर सावरकर



जयोऽस्तु ते श्रीमहन्मंगले । शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवति । त्वामहं यशोयुतां वंदे ।।

छात्र प्रबोधन

ॐ

वर्ष ५ अंक ७
सौर माघ शके १९१८


इवली शल्ये रुपती, खुपती मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी ने ज्योतिर्जगतात


**संपादक प्रकाशक**
महेन्द्र सेठिया

**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E.M.Ed.
विवेक पोंक्षे M.Sc.B.Ed.
अनघा लवळेकर M.A.B.Ed.
शैलजा देशमुख M.A.M.Ed.

**मुखपृष्ठ व आतील चित्रे**
भास्कर सगर

**अक्षर जुळणी**
प्रिंट लिंक, पुणे - ८.

**मुद्रक**
प्रबोध संपदा, पुणे - २.

**संपर्क**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०.
☎ (०२१२) ४७७६९१

**नोंदणी क्रमांक** PHM/153/VIII

**प्रकाशन दिनांक**
१० माघ, शके १९१८
३० जानेवारी १९९७

**वर्गणी**
वार्षिक - रु. १००/-
द्वैवार्षिक रु. १८५/-
त्रैवार्षिक - रु. २७५/-
आजीवन रु. २०००/


# अंतरंग


- संवाद २
- जयोऽस्तु ते स्वातंत्र्यवीर सावरकर ३
- कथा - पप्पू आणि गणू ढोल्या ८
- म्हंजे म्हंजे वाघाचे पंजे? १०
- थंडी देशोदेशीची ११
- कवितेचं पान १६
- Because You want to १७
- एका जटायूची झेप २१
- हिवाळ्यातील फुलोरा २५
- हसा हसा २९
- वाचलेच पाहिजे असे काही ३०
- जरा डोकं चालवा ३२
- साहित्य संमेलन वृत्तांत ३३
- शुद्ध शब्द लिहा ३६
- नैसर्गिक कीटकनाशके ३७
- मागोवा ९६ ३९
- शब्दकोडे ४६
- स्थानिक केंद्रांचे उपक्रम ४७
- स्थानिक कार्यालयांचे पत्ते ४८

# संवाद



प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,

गेला महिनाभर महाराष्ट्रात छान भटकंती चालू आहे. कोकण व गोव्या पाठोपाठ पश्चिम महाराष्ट्र, मुंबई, ठाणे अन् रायगड भागातील कार्यक्रमही मोठ्या उत्साहात पार पडले. अलिबाग व बोरीवली येथे नव्याने स्थानिक कार्यालये सुरु झाली. सध्या उत्तर महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून धुळ्याहून हा संवाद लिहीत आहे.

बऱ्याच ठिकाणी सभासदांबरोबर मासिकाबाबत गप्पा झाल्या. मासिकातील विविध लेख अन् लेखमालांविषयी विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले, प्रतिक्रिया व्यक्त केल्या. पण अजूनही संपूर्ण मासिक नियमितपणे वाचणारे सभासद कमी आढळले. खरं तर तुमच्यापर्यंत विविधांगी अन् सकस साहित्य पोहोचावे म्हणून संपादक मंडळ विचारपूर्वक लेख निवडत असते. ते अधिकाधिक रंजक अन् आकर्षक पद्धतीने तुमच्यापर्यंत पोहोचावे यासाठी धडपड चालू असते. तुमच्यासारख्या धडपडणाऱ्या प्रबोधकांनी हे मासिक नियमितपणे वाचावे अन् त्यावर विचार–चर्चा–कृती करावी ही आमची अपेक्षा अवाजवी आहे का? आमच्या अपेक्षांची पूर्ती करून आमचा उत्साह वाढविण्याचा प्रयत्न तुम्ही कराल ना?

छात्र प्रबोधनच्या बोधचिह्नाच्या अर्थाबाबत अनेकांना उत्सुकता होती? या बोधचिह्नातील व्यक्तिरेखा म्हणजे तुम्हा कुमारांचे प्रातिनिधिक रूप आहे. हे तुमच्यासारख्याच एका धडपडणाऱ्या प्रबोधकाचे चित्र आहे.

त्याला पंख आहेत.... उंच भरारी मारण्यासाठी आकाशाला गवसणी घालण्यासाठी..... मर्यादा ओलांडण्यासाठी! पण त्याने केवळ हवेतच राहू नये, कल्पनेच्या फक्त भराऱ्याच मारू नयेत तर वास्तवाचेही भान त्याला असायला हवे म्हणनूच त्याचे पाय पृथ्वीच्या गोलावर आहेत. वास्तवाचे भान सतत ताजे असावे, परिस्थितीप्रमाणे तोल जाऊ न देता समतोल बुद्धीने त्या त्या परिस्थितीत टिकून राहाण्याची, त्यावर ठसा उमटविण्याची वृत्ती त्या प्रबोधकामध्ये असावी म्हणून एकावर एक दोन गोल असून त्यावर त्याचा पाय आहे. (गोलांवर नुसते उभे राहायचे म्हटले तरी कसरत करावी लागते. सतत परिश्रम करावे लागतात. कौशल्य मिळवावे लागते.)

दोन्ही हात उंच करून हातामध्ये स्वत:मधील ध्येयरूपी तेजोगोल त्याने धरलेला आहे अन् ह्या तेजोगोलाची वाटचाल अधिक मोठ्या तेजोगोलाच्या दिशेने व्हावी यासाठी तो प्रबोधक एका पायावर तयार आहे. आणि तेही सहजपणे, उत्स्फूर्तपणे, किशोरवयातील उदंड उत्साह, जोष, आनंद यांसह त्याची वाटचाल चालू आहे.


असा एक आदर्श प्रबोधक पुन्हा सर्वांसमोर सतत असावा यासाठी हे बोधचिह्न आपण स्वीकारलं अन् त्याला समर्पक अशा दोन ओळी बोधवाक्य म्हणून निवडल्या.

बारीक–सारीक अडचणींनीही आम्ही निराश होणार नाही, अडून बसणार नाही, त्यांचा बाऊ करणार नाही, छोट्या मोठ्या मानापमानांनी आम्ही रुसून बसणार नाही, ते उगाळत बसणार नाही तर प्रगल्भतेने, मनाच्या उमेदपणाने, दिलदारवृत्तीने, प्रसन्न चित्ताने, विशाल अंत:करणाने आम्ही त्या सर्वांवर मात करू अन् प्रकाशाकडे झेप घेऊ, असा आहे ओळींचा भावार्थ!

२६ जानेवारीनिमित्त भारतीयत्व बाणवण्याचा (स्वाक्षरी, वेशभूषा, कालगणना, इ. माध्यमातून) प्रयत्न अन् निश्चयही केला असेल. शाळेच्या स्नेहसंमेलनामध्ये विविध गुणदर्शनात भागही घेतला असेल अन् छान छान बक्षीसेही पटकावली असतील, हे सर्व आमच्यापर्यंत पोहोचवणार ना!

तुमच्या संवाद अन् प्रतिसादाची वाट पाहात आहोत.

**सस्नेह तुमचा,**



**(महेन्द्र सेठिया)**



छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे... कृतिशील उपक्रमांचा स्रोत...!



# जयोऽस्तु ते स्वातंत्र्यवीर सावरकर

– *दत्ता श्री. टोळ*

२८ मे १८८३. नाशिक जिल्ह्यातील गोदावरीचा पवित्र परिसर लाभलेले भगूर हे विनायक दामोदर सावरकर यांचे जन्म गाव. विनायकाच्या पूर्वजांनी पेशवाईत महान पराक्रम केला. त्या पराक्रमाचा वारसा विनायकाला लाभला होता. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके ह्यांच्या मृत्यूनंतर अवघ्या तीन महिन्यांनी २८ मे १८८३ रोजी विनायकाचा जन्म झाला. म्हणजे वासुदेव बळवंत फडके यांची गादी चालवण्यासाठीच विनायकाने अवतार घेतलेला! स्वातंत्र्यासाठी आमरण झुंज देण्याचे श्रद्धेने व्रत घेतलेल्या विनायकाच्या बाळपणीची दंतकथेस साजेशी एक कथा आहे.

एकदा छोटा विनायक आणि त्याचा थोरला भाऊ बाबा मैदानावर लुटुपुटीची लढाई खेळत होते. दोघांच्या हाती धार नसलेली पण पितळेची तलवार होती. तेवढ्यात घोड्यावरून पर्किन्स नावाचा इंग्रज अधिकारी तिथे आला. त्याच्या हाती युनियन जॅक होता. ही पोरं कसली लढाई करणार? असा उद्दाम विचार करून त्या अधिकाऱ्याने विनायकाच्या हातातील तलवार पळवली अन् तो उपहासात्मक हसू लागला. संतप्त विनायकाने पाठलाग करून त्या इंग्रजाला घोडा थांबवायला भाग पाडले.

''द्या माझी तलवार'' चिडलेला विनायक म्हणाला. ''टुला कशाला पायजे टलवार''? मोडक्यातोडक्या मराठीत इंग्रजाने विचारणा केली.

''पराक्रम गाजवायला'' ताडकन् निर्भयपणे विनायकाने उत्तर दिले. त्याचे धैर्य पाहून इंग्रजाने विनायकाची तलवार परत केली.

मे १८९८. विनायक आता पंधरा वर्षांचा झाला होता. क्रांतिवीर दामोरदपंत चाफेकरांना फाशीची शिक्षा झाल्याची वार्ता विनायकाच्या कानी पडली. कुणी तप्त शिसे कानात ओततो आहे असे विनायकाला वाटले. रागाने त्याची कानशिले तापली. कृतघ्न, उलटच्या काळजाच्या इंग्रजांनी हिरावलेले स्वातंत्र्य त्यांच्याकडून हिसकावून घ्यायचं असा विनायकाने त्या क्षणी मनोमन निश्चय केला. महिषासुरमर्दिनी, सिंहावर आरूढ अष्टभुजा देवीपुढे विनायकाने शपथ उच्चारीत म्हटले, ''मी माझ्या देशाचे स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतु उभारून मारिता मारिता मरेतो झुंजेन!!''

विनायकराव सावरकारांचा श्वास आणि नि:श्वास होता स्वातंत्र्य! त्यांचं भव्य, दिव्य स्वप्न होते अखंड भारत. 'हिंदु' ह्या प्राकृत शब्दाबद्दलची त्यांची व्याख्या मोठी व्यापक होती. 'उत्कट, भव्य तेचि घ्यावे' हा जीवनाचा मूलमंत्र सावरकारांनी सदैव उराशी बाळगला. हिंदू, हिंदुस्थान, हिंद ह्या शब्दाचा मूळ उगम ऋग्वेदकालीन सप्तसिंधु या भारतीयांच्या प्राचीनतम राष्ट्रीय



With Best Compliments From SUNIKEM ENTERPRISES, PUNE.


संकल्पनेतच आहे असे ते सांगत. सिंधु शब्दाचे ग्रीक रूप Indu-India असे झाले अशी भूमिका ते आग्रहाने प्रतिपादन करीत. 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले?' असा प्रश्न विचारून स्वातंत्र्यवीर सावरकारांनी सशस्त्र क्रांतीचा अन् राष्ट्राचे सैनिक बळ अफाट असले पाहिजे ह्या मताचा अव्याहत पुरस्कार केला.

सावरकरांनी 'अभिनव भारत' 'राष्ट्रसमूह' अशा अनेक संस्थांची स्थापना केली. लोकमान्य टिळक, शिवराम महादेव परांजपे यांचे ते नि:स्सीम भक्त होते. पंडित श्यामजी कृष्णवर्मा ह्यांनी जाहीर केलेली शिष्यवृत्ती सावरकरांना लाभली. त्या आधारे बॅरिस्टर होण्यासाठी त्यांनी इंग्लंडला प्रयाण केले. अंतर्यामी मात्र तिथे जाऊन सशस्त्र क्रांतीचा उठाव करायचा हा हेतू होता.

देश, देव अन् धर्म ही त्रयी सावरकारांनी वंद्य मानली. स्वराष्ट्राभिमान नसेल तर माणसाचे जगणे तृणवत् आहे असे सावरकर सांगत. ह्या स्वदेशाभिमानापोटी त्यांनी परदेशी कपड्यांची होळी करण्याचा निर्धार केला. आपल्या देशबांधवांना कष्ट करून उपजीविका करता आली पाहिजे, त्यासाठी अन्य देशातील वस्तु त्यातही अनावश्यक माल आपल्या देशात येऊ नये हा त्यांचा आग्रह. १९०५ साली त्यांनी पुण्यात परदेशी कपडे जाळण्याचे जाहीर केले. योजनेनुसार धुमधडाक्यात परदेशी कपड्यांची होळी पेटली-समुद्रापार असलेल्या इंग्रजांना त्याची धग लागावी अशी सावरकरांची मनीषा होती. कॉलेजविद्यार्थी असलेल्या सावरकरांना ह्या कृत्याबद्दल दहा रूपये दंड अन् वसतिगृह सोडण्याची शिक्षा सुनावण्यात आली.

सावरकरांना केलेल्या शिक्षेबद्दल 'केसरी' ने कठोर शब्दात निषेध नोंदवला. स्वत:च्या मताशी पक्के असलेल्या सावरकरांना शिक्षेची तमा नव्हती. असे प्रसंग जीवनात वारंवार येणार हे त्यांना पक्के ठाऊक होते. इंग्रज सरकारविरूद्ध लढण्यासाठी शस्त्रास्त्रे तयार करणे व जॅक्सनच्या वधास केलेली मदत या दोन आरोपासाठी १९१० साली सावरकरांना काळ्यापाण्याची शिक्षा झाली.

सावरकर हिंदुत्ववादी होते. 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' असे सावरकर लेखणी अन् वाणीद्वारे सदैव सांगत. हिंदुसमाजातील जातीयतेवर ते कडाडून हल्ला चढवत. माणूस केवळ जन्माने विशिष्ट जातीचा मानला जाणे ह्याबद्दल सावरकर नाराज होते. अस्पृश्य-दलितांना जवळ करा. त्यांना मंदिर प्रवेश दिलाच पाहिजे. ह्यासाठी सावरकर अखंड झटत. ह्या



***विविध पक्ष, संघटना, सामाजिक संस्था या राष्ट्राची पूजा करण्याची केवळ फुले आहेत. देवता एक, देऊळ एक पण प्रत्येकाने आपापल्या निरनिराळ्या साधनांनी ती पूजा करावयाची आहे. यात पूजकांनी किंवा भक्तांनी आपापसांत त्या पूजेच्या साधनाविषयी भांडण्याचे काहीही कारण नाही.***

***– स्वा. सावरकर***



केदार देवगावकर याच्यावतीने छात्र प्रबोधनच्या वैशिष्ट्यपूर्ण वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

विचारातूनच त्यांनी रत्नागिरी येथे पतितपावन मंदिराची स्थापना केली.

सावरकरांना अभिप्रेत हिंदुत्व शब्द अतिशय व्यापक आहे; अमर्याद आहे; रूढार्थाने लोक मानतात तसा संकुचित नाही. म्हणूनच त्यांचा कर्मकांडावर मुळीच विश्वास नव्हता. हिंदुत्वाच्या त्यांच्या व्याख्येत विज्ञाननिष्ठादेखील होती. सावरकरांच्या विज्ञाननिष्ठेबद्दल तपशीलाने पुढे विचार मांडतो. त्यापूर्वी हिंदुत्व अन् विज्ञाननिष्ठा त्यांच्या विचारात आचारात कशी एकवटली ते नमूद करतो. सावरकरांनी आपल्या मृत्युपत्रात 'माझा अंत्यविधी परंपरा रूढीनुसार न करता त्यावर केवळ अग्निसंस्कार केला जावा.' अशी इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार त्यांचे पार्थिव शरीर सरळ विद्युतदाहिनीला समर्पित केले गेले. 'माणसाचे रोग बरा करणारा तो देव असेल तर रोग निर्माण करणारा कोण?' असा परखडपणे प्रश्न विचारण्याचे धैर्य सावरकरच दाखवू जाणे! हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व असे ते सांगत. सर्वधर्मसमभाव, विश्वाचे कल्याण ही ज्ञानेश्वरांची भूमिका सावरकरांनी शिरोधार्य मानली होती.

सावरकर दृढ विज्ञानवादी-विज्ञाननिष्ठ होते. मात्र विज्ञान मानवजातीच्या कल्याणासाठी उपयोगात आणावे हा त्यांचा आग्रह होता. म्हणूनच मर्त्य देहावर अग्निसंस्काराखेरीज अन्य कुठलेही सोपस्कार करू नयेत हे त्यांनी निक्षून सांगितले होते. 'जे सृष्टीनियम प्रयोगान्ती सर्वथा अबाधित, शाश्वत आहेत असं विज्ञानशास्त्रात सिद्ध झालं, तोच काय तो खरा सनातन धर्म' असे सावरकर म्हणत. म्हणूनच 'यंत्र हे मनुष्याला अतिमानुष करणारं वरदान आहे. शाप नव्हे' अशी सावरकरांची उक्ती आहे.

भाषाशुद्धी हे सावरकरंनी अंगिकारलेले कार्य होते. आज अनेक भाषामिश्रित झाल्यामुळे मराठी अशुद्ध झाली आहे. तसेच इंग्रजी भाषेबद्दल असलेला अवाजवी अभिमान यामुळे मायबोलीची अवहेलना चालली आहे याची त्यांना खंत होती. इंग्रजीखेरीज आम्हांला आपले विचार प्रभावीपणे मांडता येत नाहीत, याविषयी त्यांना चीड होती म्हणून रूढ झालेल्या इंग्रजी शब्दांना पर्यायी अशा किमान अर्धसहस्त्र नवीन शब्दांची त्यांनी मराठी भाषेला देणगी दिली आहे. स्टेशनला स्थानक, मेयरला महापौर, कॅलक्युलेटरला गणक अन् कॉम्प्युटरला संगणक ही त्याची उदारहरणे. मायबोलीचा अभिमान बाळगणाऱ्या सर्व मराठी माणसांनी मराठी भाषेच्या वृद्धीसाठी, शुद्धतेसाठी झटले पाहिजे. हे जमेल तेव्हा, संधी मिळताच ते सांगत.

***आपली प्रत्येक रूढी आणि आजार आजच्या परिस्थितीत आपल्या हिंदुराष्ट्राच्या उद्धारणास उपयुक्त आहे की नाही, तो बुद्धिवादास टिकतो की नाही हे शास्त्रीय कसोटीवर पारखून स्वीकारणे आवश्यक आहे.***



*- स्वा. सावरकर*



मंदार देवगावकर तर्फे प्रबोधकांना बलसंपन्न व आरोग्यपूर्ण वाटचालीसाठी शुभेच्छा!

लेखनासाठी मन:स्वास्थ्य, आल्हाददायक वातावरण अशा कितीतरी बाबींची गरज असते असे सांगितले जाते, त्या पार्श्वभूमीवर सावरकरांनी कारागृहात प्रभावी काव्यरचना केली हे आश्चर्यच मानले पाहिजे. लोकमान्यांनी कारागृहात गीतारहस्याचे लेखन केले. सावरकरांनी काथ्या वळणे, कोलू (घाणा) चालवणे ह्यासारख्या देहाला कष्टप्रद शिक्षा भोगीत असतांना; अनेक वेळा अंगात ज्वर असताना हजारो पाने लिहिली. लेखनसामुग्री उपलब्ध नसताना शब्द भिंतीवर लिहिणे, लिहिलेले शब्द भिंतीची रंगरंगोटी होण्यापूर्वी पाठ करणे ह्या पद्धतीने लेखन केले. शब्दसृष्टीच्या ह्या ईश्वराच्या ह्या अलौकिक कार्याची संगती लावणे कठीणच.

सावरकरांच्या अलौकिक प्रतिभेबद्दल लिहावे तेवढे थोडे आहे. अतिशय ओजस्वी असे काव्य, 'माझी जन्मठेप' सारखे आत्मचरित्र, 'काळेपाणी' ही कादंबरी, विविध विषयांवरील भाषणे, नाटके अशा त्यांच्या लेखनसंपदेने मराठी वाङ्मयाची समृद्धी वाढवली आहे.


प्रबोधक मित्रांनो, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनातील केवळ काही प्रसंग तुम्हाला सांगितले. सावरकरांचे जीवनकार्य खरेखर सर्वांगाने जाणून घ्यायचे असेल तर तुम्ही जमेल तसे सावरकरांचे समग्र वाङ्मय अवश्य वाचा.

**

---

**दत्ता श्री. टोळ**
स्वरांजली, साहित्य परिषदेसमोर
पुणे ४११ ०३०.

## *सावरकरांचे विचार*



***मला भाषाशुद्धी हवी ती दोन गोष्टींकरीता हवी आहे. एक आपली भाषा निर्भेळ राहावी यासाठी आणि दुसरी म्हणजे तिच्यावरील आक्रमण हे आपल्यावरील परकीयांच्या स्वामित्वाचे निदर्शक आहे यासाठी. आमचा पहिला कटाक्ष असा की मराठी भाषेत जे अनावश्यक परकीय शब्द घुसले असतील त्यांना हुसकावून लावा व दुसरा कटाक्ष असा की आपल्या भाषेत रूढ झालेल्या ज्या परकीय शब्दांना नवे शब्द बनविता येतील किंवा त्या अर्थाच्या जुन्या शब्दाचे पुनरूज्जीवन करता येईल ते करा.***

*

***आचार, रूढी, निर्बंध हे सारे मनुष्यातीलऐहिक व्यवहाराचे नियम परिस्थिती पालटेल तसे पालटीतच गेले पाहिजेत. ज्या परिस्थितीत जो आजार वा निर्बंध मनुष्याच्या धारणास आणि उद्धरणास हितप्रद असेल तो त्याचा त्या परिस्थितीतील धर्म, आचार, निर्बंध 'न हि सर्वहित:कश्चिदाचार: संप्रवर्तते, ते नैवान्य: प्रभवति सोऽपरो बाधते पुन: ।।***

*

***जे सृष्टिनियम विज्ञानास प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगांती सर्वथैव अबाधित, शाश्वत, सनातन असे आढळून आले आहेत तेच काय ते खरे सनातन धर्म होत.***

*



With Best Compliments from - JAISONS ENGINEERING TECHNOLOGY, pune

# पप्पू आणि गणू टोळ्या

– श्री. अरुण देशपांडे





कॉलनीच्या जवळ असलेल्या मैदानात एकत्र येऊन गप्पा मारणे हा पप्पू आणि त्याचे सहकारी मित्र यांचा आवडता छंद होता. सारंग, राहूल, अजय, अमोल ही सर्व मंडळी संध्याकाळच्या वेळी इथे हमखास सापडायची. त्यांच्या आई–वडिलांनाही हे माहीत झाले होते.

आता देखील हे सर्व मित्र वायफळ

गप्पा मारत, टवाळक्या, टिंगल करण्यात दंग झालेली होती. रस्त्यावरून आपल्याच तंद्रीत जाणाऱ्या एका मुलाकडे पाहात राहूल म्हणाला, ''अरे, तो पहा ढब्बू पहिलवान!'' या थट्टेवर सगळेजण हसले.

''भलताच आखडू वाटतो रे हा मुलगा.'' कुणीतरी उगीचच शेरा मारला. गप्पा मारून कंटाळा आल्यावर एकेकजण घरी परतू लागले. रात्रीच्या जेवणाच्या वेळी पप्पूकडे सर्वजण एकत्र जेवायला बसत. आजही त्यांच्या अशा गप्पा, हसणे, खिदळणे चालू होते. एवढ्यात आपल्या घराकडे येणाऱ्या गणूला पाहून पप्पूला आश्चर्यच वाटले.

''या ढोल्याचे आपल्याकडे काय काम असावे?'' असे विचार त्याच्या मनात आले.

पप्पूच्या बाबांना गणू म्हणाला,

''माझं थोडं काम आहे तुमच्याकडे. पण तुमचं जेवण होऊ द्या.'' गणूच्या व्यवस्थित बोलण्याचे बाबांना खूप कौतुक वाटले. बाबा आणि पप्पू बाहेर येऊन बसले. बाबांनी विचारले. ''कुणीकडे आलास?''

''आपल्याशी परिचय नसताना मी आलो तरी गैरसमज नसावा.'' '' माझे नाव गणेश.''

बाबांनी विचारले, ''तुझे काय काम आहे ते सांग.''

''काका, तुमच्या ऑफिसातले सूर्यकांत भिडे हे नामांकित चित्रकार आहे. मला देखील चित्रकलेची आवड आहे. त्यासाठी भिडेकाकांचे मार्गदर्शन मिळावे म्हणून तुम्ही मला त्यांच्याकडे घेऊन जाल का?''

गणूने आपल्याबरोबर चित्रांचा संग्रह आणलेलाच होता. तो बाबांना दाखवला. संग्रहातील सगळीच चित्रे अगदी सुरेख वाटत होती. गणूचा हात कलाकाराचा होता. संग्रहात अनेक निसर्गचित्रे होती. नदीकाठचा सूर्यास्त, डोंगरमाथ्यावर शेळ्या चारणारा गुराखी मुलगा, झाडांच्या सावलीत झोपलेला म्हातारा ही सारी चित्रे पाहून बाबा बेहद्द खूष झाले. त्याला शाबासकी देत म्हणाले,

''गणू, रविवारी सकाळी तू ही चित्रे घेऊन ये. आपण भिडेकाकांकडे जाऊयात. ते तुला नक्कीच मार्गदर्शन करतील.'' बाबांचे आभार मानून गणू घरी परतला. पप्पूला आई म्हणाली.''बघ मनात असले तर माणसाला खूप काही शिकता येतं. तू आणि तुझे मित्र नुसते आळशी आहात!'' रविवारी सकाळी चित्रांचा संग्रह घेऊन गणू पप्पूच्या घरी हजर झाला. पप्पू मात्र अंथरूणात लोळत पडून रंगोली पाहात होता. गणूला आलेला पाहून त्याला वाटले, ''काय म्हणावे या गण्याला! मस्त आराम करायचा सोडून निघाला बाहेर. येडाचआहे!'' पप्पूचे बाबा तयार होऊन आले आणि याला म्हणाले,

''चल की रे पप्पू!'' गणूने आग्रह केला. पप्पू मात्र जागचा उठत नाही हे पाहून आई म्हणाली,

''जा रे पप्पू, एक दिवस रंगोली



प्रायोजक : महाराष्ट्र ॲग्रिकल्चर बायोटेक, पुणे ३०.




पाहिली नाहीस म्हणून बिघडणार नाही.'' पप्पूला मनातून खूप राग आलेला होता. पण आई-बाबांच्या पुढे त्याचे काहीच चालणार नव्हते.

बाबांना पाहून भिडेकाका म्हणाला, ''आश्चर्यम्! तुम्ही कसे काय बुवा वळलात आमच्याकडे?'' ''मी एका नवोदित चित्रकाराला घेऊन तुमच्याकडे आलो आहे.'' बाबा भिडेकाकांना म्हणाले. गणूने भिडेकाकांसमोर आपला संग्रह ठेवला. काकांनी लक्षपूर्वक सगळी चित्रे पाहून घेतली. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान उमटलेले दिसले. ते म्हणाले, ''बाळ, तुझ्या हातात कला निश्चितच आहे. अधिक सरावाने तू अधिक प्रगती करू शकशील. सातत्याने चित्रे काढत जा. मात्र अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ देऊ नकोस.'' भिडेकाकांनी नंतर पप्पूलाही विचारले, ''तुला आवडणारे कोणते छंद आहेत?'' काकांच्या प्रश्नाला काय उत्तर द्यावे या विचारात पप्पू असतानाच गणूनेच उत्तर दिले, ''काका, पप्पू बुद्धिबळ छान खेळतो. मी त्याच्याकडून शिकणार आहे बुद्धिबळ.''

गणूच्या या उत्तरावर पप्पू आश्चर्यचकित झाला. ऐनवेळी गणूच त्याच्या मदतीला धावून आला होता. भिडेकाकांचे आभार मानून गणू, पप्पूसह बाबा घराकडे परतले. दोन महिन्यांनी भिडेकाकांचा निरोप आला. ''आजपासून आठवडाभर शहर ग्रंथालयात चित्रांचे प्रदर्शन आहे. आपण सर्वांनी भेट द्यावी अशी इच्छा आहे.''

काकांचा निरोप कळताच पप्पूच्या घरची सर्व मंडळी व त्याचे सहकारी मित्र प्रदर्शन पाहाण्यासाठी गेली. भिडेकाकांनी सर्वांचे स्वागत केले. मोठ्या हॉलमध्ये सुरेख सजावट करून प्रदर्शन मांडले होते. प्रेक्षकांची खूप गर्दी होती. एका बाजूला गणू उभा असलेला पाहून पप्पू आणि कंपनीला आश्चर्य वाटले.

''हा ढोल्या इथे काय करतोय?'' सर्वजण त्याच्याजवळ गेले. गणू सांगू लागला.

''मित्रांनो! भिडेकाका फार मोठ्या मनाचे कलावंत आहेत. त्यांनी स्वत:च्या चित्रांचे प्रदर्शन भरवताना माझ्याही चित्रांना स्थान दिले आहे. आज त्यांच्यामुळे माझी कला लोकांच्यासमोर आली. नाहीतर मी चित्रकार आहे हे कोणाला समजले नसते. भिडेकाकांच्या प्रदर्शनाला भेट देणाऱ्या प्रत्येकाने गणेशची चित्रे आवर्जून पाहिली. त्याचे कौतुक केले. आई-बाबांनी गणेशला शाबासकी दिली. प्रदर्शन पाहून परत येताना सारंग म्हणाला, ''पप्पू, आपण किती वेडे आहोत रे? या गणेशला आपण नाही नाही ती नावे ठेवीत होतो. त्याला गणू ढोल्या म्हणून चिडवत होतो. आज कळले, तो किती मोठा कलाकार आहे ते.''



प्रायोजक : कौशिक एंटरप्राईजेस, पुणे - ३८.

राहूललाही राहवले नाही. तो म्हणाला, ''खरंच आपल्याला काहीही येत नाही, तरी आपण दुसऱ्याला मूर्ख, वेडे ठरवीत असतो. दुसऱ्याला नावे ठेवण्याचा आपल्याला काहीच अधिकार नाही. हे मला चांगलेच कळले.''

पप्पूला व त्याच्या मित्रांना मनातल्या मनात आपली चूक कळली आणि नवीन काहीतरी करणचा निश्चय करून ती घरी परतली.

**

**ले. अरूण वि. देशपांडे**
'वरदान' ४१, श्रीरामनगर, कारेगाव रोड, परभणी. ४३१४०१.

# म्हंजे म्हंजे वाघाचे पंजे!



प्राण्यांच्या पंजांच्या ठशांवरून आपण प्राणी ओळखू शकतो. व त्या ठशांवरून प्राण्याविषयी अभ्यास करू शकतो. यासाठी वेगवेगळ्या प्राण्यांच्या पंजांचे ठसे कसे मिळवावेत हे पाहू या.

प्रयोग – पहिल्यांदा एखाद्या प्राण्याच्या पंजाचा ठसा घ्या. त्याच्या भोवताली चार काठ्या त्याची सीमारेषा निश्चित करण्यासाठी लावा. मेण वितळवा आणि कापेऱ्याकडून ते मेण चौकटीत ओता. ज्यावेळेस ते मेण घट्ट होईल तेव्हा ते काढून घ्या. आता तुम्हाला मेणामध्ये पंजाचा ठसा मिळाला आहे. असाच ठसा चिखल, सिमेंट, प्लॉस्टर ऑफ पॅरिस वापरूनही मिळू शकेल.

असे ठसे मिळविल्यानंतर त्यांच्या आधारे प्राण्यांविषयी तौलनिक अभ्यास करता येईल.

१) या पंजाच्या ठशाची इतर चार पायांच्या प्राण्यांच्या पंजांच्या ठशांशी तुलना करा.,२) माणसाच्या डाव्या, उजव्या पायाची तुलना करा., ३) एकाच प्राण्याच्या नर आणि मादीच्या पायाच्या ठशांची तुलना करा., ४) जंगली आणि पाळीव प्राण्यांच्या ठशांची तुलना करा., ५) माणूस आणि माकड यांच्या ठशांची तुलना करा.

विद्यार्थी–मित्रांनो, जंगल प्राण्यांचे ठसे मिळवण्यासाठी तुम्हाला प्राणिसंग्रहालयाच्या प्रमुखांची परवानगी काढावी लागेल. आणि या व्यक्ती वन्य प्राण्यांना खायला घालतात त्यांच्या मदतीने वन्य प्राण्यांचे ठसे मिळू शकतील. अवघड असले तरी हे काम अशक्य निश्चितच नाही.

मग तुम्हाला विविध प्रकारे पंजांच्या ठशांचे वर्गीकरण करता येईल. ठशांच्या आधारे जंगलामधील विशिष्ठ प्रकारच्या प्राण्यांची संख्या सुद्धा मोजता येईल.

प्राण्यांचे वय, पाळीव आणि जंगली प्राणी, शाकाहारी आणि अन्य, सस्तन, पक्षी, कीटक अशा विविध संदर्भाच्या धर्तीवर वर्गीकरण करून बघा. त्यातून काय निष्कर्ष निघतात ते पाहा. अभ्यासाच्या अनेक दिशा तुम्हाला खुल्या झालेल्या दिसतील.

**अमेय, स्वप्निल, निरंजन, वरूण**
इ. ९वी, ज्ञानप्रबोधिनी, पुणे.



प्रायोजक : मे. ओम. कन्स्ट्रक्शन, प्रोप्रा. माणिकराम हळबे, पुणे ४११ ०३०.

# थंडी देशोदेशीची

# गोठवणारे मॉस्को

*– नरेंद्र सिंदकर*

***मॉस्को म्हटलं की बर्फ, थंडी, धुके यांनी सदा वेढलेले थंडगार शहर: जणू थंडीचं माहेरघरच आणि ह्याउलट आखाती देशात असतं. बाहरीनच घ्या ना! तिथं दशकातून कधीतरी एकदाच थंडी पडते तीही अपवादानंच. एरवी अंग जाळणाऱ्या उष्म्याचाच प्रदेश म्हणाना तो, आपल्याकहे सध्या थंडीचे दिवस आहे. पाहूयात मॉस्कोत आणि बाहरिनमध्ये थंडी काय म्हणते ते!***

मॉस्कोमध्ये माझे २६ वर्षे वास्तव्य घडले. अनेक गोष्टी स्मरणात राहिल्या. त्यातीलच एक मॉस्कोतील थंडी! ९ फेब्रुवारी १९६६ रोजी दिल्लीच्या 'पालम' विमानतळावरून उड्डाण केले तेव्हा, दिल्लीत तापमान शून्याच्यावर २५ सेल्सियस होते. मॉस्कोच्या 'शेरीमेतेवो' विमानतळावर उतरले तेव्हा, ते तापमान शून्याखाली २५ सेल्सियस होते. विमानातून उतरणाऱ्या सर्वांनी अंगावर विंटरकोट, गळ्याला मफलर आणि पायात जाड परलाइन्ड बूट घातले होते. फक्त मी, माझी पत्नी आणि दोन लहान मुले यांच्या अंगावर स्वेटर आणि कोटाशिवाय काहीही नव्हते. गोठवत्या थंडीत एवढ्याच कपड्यानिशी उतरणाऱ्या आमच्याकडे माणसे चकित होऊन बघत होती.

आत विमानतळाच्या इमारतीत मला उतरून घेण्यासाठी दुद्मिला नावाची मुलगी आली होती. आमच्याकडे बघून ती आश्चर्याने म्हणाली ''तुम्ही विंटरकोट नाही घातला?''

गाडीत बसून रस्त्याने जातांना रस्त्याच्या दुतर्फा बर्फाचे ढीग दिसत होते. ते ढीग पाहून आनंदाने टाळ्या पिटीत माझी मुलगी राणी म्हणाली,''बाबा, आता रोज मी आइस्क्रिम खाणार!'' तिचे हे उद्गार मी मॉस्को सोडेपर्यंत दुद्मिलाच्या स्मरणात होते.

रशियन थंडीचा बागुलबुवा उभा करून मला बहुतेकांनी मॉस्कोला जाऊ नका असा पोक्त सल्ला दिला होता. ती, बर्फाच्या भिंती असलेल्या त्या शीतगृहात मी एक दोन नव्हे तर, २६ वर्षे राहिलो.

त काय असत? मा बावळटासारख विचारलं. ती काही बोलली नाही. समजायचं ते समजली. आमची उतरण्याची सोय 'ओस्तान्किना' या आलिशान हॉटेलात करण्यात आली होती.



प्रायोजक : मे. आर. डी. वीरकर आणि कं. वीट कारखानदार. सिंहगड रस्ता, पुणे

# थंडी देशोदेशीची

मॉस्कोची थंडी कशी असते त्याचे वर्णन करता येणार नाही. कधी कधी वाटते, मॉस्कोत तोंडातून बाहेर पडल्यापडल्या, सगळ्या शब्दाचा बर्फ होतो. ते गोठलेले शब्द घरी नेऊन वितळले म्हणजे, त्यातून बोललेले ऐकू येते म्हणे

हा विनोद जरी बाजूला ठेवला तरी, मॉस्कोची थंडी 'कराल' या एकाच शब्दात सांगता येईल. मरणाची थंडी! या भीषण थंडीनेच जगावर स्वस्तिक ध्वज फडकवण्याला निघालेल्या हिटलरच्या फौजा गोठून गेल्या आणि चक्रवर्ती नेपोलियनची दातखिळी बसली.

मॉस्कोत थंडी अचानक येते. सप्टेम्बर महिन्यात रिमझिम पाऊस पडत असतो. ऑक्टोबर महिन्यात कोसळणाऱ्या धारेचा कापसासारखा बर्फ होतो. याच त्या हिमशलाका!



रात्री झोपी जावे तेव्हा झाडे निष्पर्ण असतात. सकाळी उठून पाहिले की, सगळी सृष्टी पांढरीशुभ्र दिसते. घरे, झाडे बर्फाने पूर्णपणे झाकून गेलेली असतात. बर्फच बर्फ चहूकडे असे बर्फाळ दृश्य दिसते. निष्पर्ण झाडावरती बर्फाचे पुंजके लटकत असतात. हिरव्याकंच पानांचा सर्वसंग परित्याग करून संन्यस्त झालेल्या झाडांनी बर्फाचे भस्म फासलेले असते. खाली बर्फ वर बर्फ, सारे पांढरेशुभ्र! जणू काही आकाशातल्या प्रचंड घंघाळातून दुधाचे सागरच खाली कोसळलेत! सप्टेम्बर महिन्यात थंडीची चाहूल लागते.

उन्हाळ्यात माणसे चक्क उघडी हिंडतात पण, हिवाळ्यात मात्र, एकावर दुसरे दुसऱ्यावर तिसरे असे वस्त्र चढत जाते.

सप्टेम्बरच्या सुरूवातीला शून्यावर १०-१५ सेल्सियस असणारा पारा काडकन् मुस्कटात मारावी असा एकदम शून्याखाली घसरतो, आणि आर्क्टिक महासागराचे वारे अंगाला झोंबू लागतात.

अंगात आतून घालायचे लोकरीचे कपडे, एकावर एक चढविलेले लोकरीचे तीन-चार मोजे, शर्टवर स्वेटर आणि कोट त्यावर मणभर वजनाचा विंटरकोट, डोक्याला केसाळ कातड्याची टोपी असे एकावर एक लोकरी कपड्यांचे चिलखत घालून



प्रायोजक : परांजपे पोल्ट्री फार्म, दुर्गामाता मंदिरामागे, सांगली.

# थंडी देशोदेशीची

बाहेर पडले तरी सगळ्या चिलखताचा भेद करणारी थंडीची तलवार बाहेर पाय पडला की, अंगावर कोसळते. बसची वाट बघत उभे राहिले की, पाच मिनिटातच नाक, कान हे महत्त्वाचे अवयव गळून पडून आपली 'शूर्पणखा' झाली असे वाटू लागते. मग बंदिस्त इमारतीत प्रवेश केला म्हणजे, हरवलेले अवयव जागच्या जागी आहेत हे पाहून समाधान वाटते.

हिवाळ्यात घराची दारे, खिडक्या बंद असतातच पण, त्यांच्या फटीही कागद चिकटवून बंद कराव्या लागतात.

पण, थंडीचा ऐन मोसम सुरू झाला की, रशियन रक्त सळसळू लागते. घसरफळ्या हाती घेऊन किंवा बुटाला पाती लावून स्केटिंग किंवा स्किइंग करण्यासाठी माणसांच्या झुंडी धावू लागतात. यात चार वर्षाच्या बालकापासून ९४ वर्षाच्या वृद्धापर्यंत सारे असतात. ही माणसे थंडीला भेटत नाहीत तर, कडकडून झोंबतात.

एक दिवस तर, मी भयंकर दृश्य पाहिले. तापमान शून्याखाली ३० होते. आणि आमच्या शेजारी राहाणारा दाढी राखलेला एक तरूण अंगावर फक्त अर्धी चड्डी आणि उघडाबंब होऊन जॉगिंग करीत होता. या थंडीत थंडगार पाण्यात उतरणारी माणसेही आहेत. रशियन माणूस हाडापेरानं रूंद, धिप्पाड, दणकट आणि कमालीचा सोशिक आहे. दुसऱ्या महायुद्धात चर्चिलने अशाच एका थंडीच्या मोसमात मॉस्कोला भेट दिली. त्या विक्राळ थंडीत तो हाडाचा लढावैय्याही गोठला. मोटारीत बसल्यावर त्याने बाहेर पाहिले. त्या गोठवत्या थंडीत रस्त्यावर माणसांची रांग दिसली.

''कशासाठी रांग आहे?'' चर्चिलने विचारले,

रशियन अस्वलासारख्या मिशा असणाऱ्या स्टॅलिनने पाईपमधून धूर सोडीत सांगितले,

''ही आईस्क्रिमसाठी लावलेली रांग आहे.''

चर्चिल चकित झाला. त्या भाषाप्रभु मुसद्याने एवढेच म्हटले,

''या भयानक थंडीत जिथली माणसं आईस्क्रिमसाठी रांग लावतात ते राष्ट्र अजिंक्य आहे''.

म्हणूनच माणसाचा लोळागोळा करणाऱ्या, गोठवणाऱ्या भयानक थंडीत पिढ्यान्‌पिढ्या रशियन माणूस ताठ उभा आहे. बाहेरच्या बर्फाला तोंड देणाऱ्या रक्ताची ज्वाला त्याच्या धमन्यातून फुरफुरत आहे. वर बर्फ आणि आत अग्नी असलेला 'स्लाव रशियन' अजिंक्य आहे, दुर्दम्य आहे.

**

**नरेन्द्र सिंदकर**
१२ कल्याण, ३२ रामबाग कॉलनी,
पौंड पथ, कोथरूड पुणे ३८



चि. ऋषिकेश कुलकर्णीकडून प्रबोधकांना शुभेच्छा !

# थंडी देशोदेशीची

# बाहरीनची काटेरी थंडी

***– सौ. रोहिणी करंदीकर***

ऋतुचक्राचा आणि मानवी जीवनाचा अतूट संबंध आहे. आपल्याकडे उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा ह्यांच्या खुणा म्हणजे, उन्हाळ्यात माणसांच्या अंगावरची वस्त्रं तलम होतात, पावसाळ्याची चाहूल लागली की, माणसे छत्रीधारी होतात किंवा रेनकोटसारखी वस्त्रं अंगावर चढवतात. हिवाळा आला की, माणसांच्या अंगावर स्वेटर्स चढतात, गळ्याभोवती मफलर गुंडाळले जातात.

बाहरीनमध्ये याहून फारसे वेगळे नसते, तरीही, माणसाचे सृष्टीशी असलेले नाते अधिक उत्कटतेने प्रत्ययाला येते.

उन्हाळ्यात भट्टी पेटलेली असते. सहस्त्ररश्मी, दशलक्षरश्मी असल्यासारखे वाटू लागते. उन्हाळा किती असावा? कोवळं ऊन जवळ जवळ नसतंच! उगवलेला भास्कर संतप्त होऊनच क्षितिजावर येतो. पुण्यात दुपारी मे महिन्यात बसणारा चटका तिकडं सकाळी आठलाच बसू लागतो. घरात बसवत नाही, बाहेर पडवत नाही. A. C. चैन नसते, गरज असते. उन्हाच्या झळा घरात घुसतात. बाहेर पडलं की, पाचच मिनिटात घामाने सचैल स्नान घडते.

हिवाळ्यात मात्र, निसर्ग गर्रकन् गिरकी घेतो. उन्हळ्यात सुमारे साडेसहा–सात वाजता मावळणाऱ्या सूर्याचा दिवस चार साडेचार वाजताच काळोखू लागतो. उन्हाळयात घामाच्या धारा तर, हिवाळ्यात थंडगार वाऱ्याचा सपकारा. A. C. बंद होतात अणि हिटर त्याची जागा घेतात.

तसं पाहिलं तर, बाहरीन म्हणे काय? नुसती रेती! पण, धरतीचं हे वरवरचं रूप असतं. सबंध जगाची चक्रं ज्यावर चालतात त्या वसुंधरेच्या गर्भात, पेट्रोल नावाचे एक अद्‌भुत रसायन तिथे आहे, आणि ही उदार धरती भरभरून देते आहे. 'बहुरत्ना वसुंधरा' असं म्हणतात. मला वाटतं, बाहरीनमध्ये सदैव एक अग्निहोत्रच चालू आहे. आकाशात पेटलेली आग आणि भूमीच्या उदरात सगळ्या जगाला चालते करणाऱ्या इंधनाची आग!

या आगीला दिलासा देण्यासाठी नाजुक आणि तरल पावलान थंडी येते. ही थंडी खानदानी यवनसुंदरी असते. कारण, बुरख्यातील स्त्रीच्या पायाचे नखही दिसत नाही तसा बाहरीन सुंदरीनं धुक्याचा बुरखा चढविला की, काहीच दिसत नाही. दिसतो तो फक्त धुक्याचाच समुद्र! यवनसुंदरीने मुखावरचा बुरखा दूर करताच तिची आरस्पानी कांती, – राजवर्खी ओठ आणि



प्रायोजक : स्वस्तिक बिल्डर्स (अनिल लोढा, रोजंद्र गोठी) मखमलाबाद नाक्याजवळ, नाशिक ५१३ ९६०

हरणासारखे डोळे दृष्टीला पडावेत त्याप्रमाणे सागराच्या निळ्या वस्त्राचे पदर उलगडूं लागतात. रंगाचा अद्‌भुत चमत्कार ओसरत्या आणि विरत्या धुक्यातून पाहाणं म्हणजे एक आनंदाचा साक्षात्कारच आहे. थंडीला अशी अनंत रूपे आहेत. मात्र, ती बघता आली पाहिजेत. ती ज्याला बघता येतील त्याला उन्हाळ्याची रूद्र उग्रता जशी जाणवेल तशीच, थंडीची नाजूक नजाकतही भावेल.

बाहरीन हा वालूकामय प्रदेश म्हणजे, तसे वाळवंटच! आकाशाला भिडणाऱ्या डोंगराळप्रदेशाप्रमाणे क्षितिजापर्यंत पसरलेल्या अफाट वाळवंटाच्या काही लहरी असतात. काही माणसे संतापली की तोंडाचा पट्टा सोडतात आणि रूसली की, मिठाची अशी गुळणी धरून बसतात की वाटावे यांनी भडाभडा काय ते बोलून टाकावे! तसेच बाहरीनमध्ये वर सांतिल्याप्रमाणे उन्हाळयाची भट्‌टी पेटलेली असते. तर, थंडीत त्या भट्टीऐवजी फ्रीजमध्ये बसल्यागत वाटावे. जाळणाऱ्या बाहरीनमध्ये अनुभवलेल्या थंडीत कुडकुडताना कुसुमाग्रजांची एक कविता मराठी माणसाला नेहमी आठवावी.

'हिमलाट पहाटे पहा जगावर आली!

इथे प्रत्यक्षात हिमलाट नसली तरी, थंडी अक्षरश: बोचकारे काढीत अंग अंग गोठीत येते.

वर निळे आकाश आणि खाली रेताडाचं आकाश. अशा दोन आकाशांत सापडल्यागत माणसाची असहाय अवस्था होते. वाळवंटात निसर्गाला न बोलता शरणच जावे लागते. तरीही बाहरीनचं कौतुक हे की, अफाट वाळवंटातही माणुसकीचा हिरवा अंकुर वाळवंटाला फुटलाय, आणि एक अंकुर फुटला की, 'एका बीजापोटी तरू कोटी कोटी' वाटावं अशा नाजूक वनश्रीनं गुर्मी दाखविणाऱ्या रेताडाचा आपल्या नाजुकतेनं कसा पराभव केलाय ते जाणवतं आणि आठवतं की, मग्रूर राजसत्तेला संतांची सात्त्विक सत्ता गुडघे टेकायला लावते.

दोनच ऋतू बाहरीनमध्ये उन्हाळा, हिवाळा! पावसाळा ऋतू नाही. त्यामुळे रिमझिमणारा पाऊस नाही; कोसळणाराही नाही. लहानपणी म्हटलेली 'येरे येरे पावसा' किंवा 'श्रावणमासी हर्ष मानसी!' अशी गाणी पण नाहीत. कविकुलगुरू कालिदास ते कुसुमाग्रज अशा थोर कवींनी केलेल्या वर्षाऋतुच्या कौतुकात आपणही इंद्रधनुष्याच्या सप्तरंगात चिंब चिंब होतो. मात्र बाहरीमध्ये कधीतरी दोन तीन वर्षांनी पाच-सहा दिवस पाऊस पडतो. बाहरीनवरील वर्षाऋतुचा राग मात्र अजून गेलेला नाही.

विमानात बसले की, आकाशाची असीमता जाणवते. थंडीतल्या बाहरीनमध्ये धरणीची असीमता अंगावर चालून येते. तरीही, बाहरीनच्या पेटत्या ज्वाळा आणि धुक्याचा सागर या साऱ्यांना आठवणीच्या मंजुषेत मी पक्कं 'मोहोरबंद' करून ठेवलं आहे !

**

**– रोहिणी करंदीकर**
प्राध्यापक निवास, फर्ग्युसन कॉलेज,
पुणे – ४.



प्रायोजक : नातू चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे



## तळं

डोंगराच्या पायथ्याशी छोटंसं तळं,
तळ्याचं पाणी चमचम निळं.
काठावरची गोंडस फुलं,
तळ्यात बघती रूप आपलं.
हिरव्या हिरव्या झाडांच्या सावल्या,
तळ्यात बघण्यास खाली झुकल्या.
छोट्याशा मासोळ्या चमचम करिती,
इकडून तिकडे सुळकन पळती.
काठावरचा ढोंगी बगळा,
इतरांना वाटतो हा साधूच वेगळा.
बदकराव हे संथ तरंगतात,
जणु पोहण्याचा सराव करतात.
तळ्याच्या काठावर पिंपळ छान,
फांदीवरी झुले कोकिळेचे गान.
छोटासा झरा डोंगरामधला,
भेटायला येतो दूर तळ्याला.

**कु. प्रिया खानगावकर**
७५४ कसबा पेठ,
पुणे ११.



## हे कधी संपणार?

आम्हाला उंच उडायचंय
ह्या जगाच्या बंधनातून मुक्त व्हायचंय
हे सुंदर जग डोळे भरून पहायचंय.
पलीकडील श्रीमंत जगच येथे निर्माण करायचंय.
पण उंच उडण्याकरिता...:....
आमचे हिंमतीचे पंख घट्ट बांधावे लागतील.
जातीयवादाच्या भिंती मोडाव्या लागतील.
मायेचे पाशही तोडावे लागतील.
जिद्दीने प्रयत्न करावे लागतील.
देशाला कुरतडणाऱ्या अपप्रवृत्ती चेचाव्या लागतील.
आणि आम्ही हे करू!
प्रत्येकाचे विचार वेगळे....
कोणाला पंखच बांधता येत नाहीत.
जातीयवादाच्या भिंती तर फारच चिवट,
त्या तर लवकर मोडतच नाहीत.
मायेचे पाश चुकीच्या ठिकाणी तुटतात.
देशाचा कुरतडणाऱ्या अपप्रवृत्ती शिरजोर
बनतात.
काही जिद्दीने प्रयत्नच करीत नाहीत.
स्वातंत्र्याची पन्नास वर्षे आम्ही कशी घालवली?
ह्यावर लेक्चर नकोय आम्हाला.
आम्हाला सगळ्यांना एकत्रच उडायचंय.
कधी जमणार हे आम्हाला?
आम्हाला कधीच का उडता येणार नाही?
सांगा ना? सांगा कोणीतरी आम्हाला.

**कु. रोहिणी चंद्रात्रे**
'साधना' सद्गुरुनगर, नाशिक ४२२ १०१.



'Save Trees, Reuse Paper' - Dr. H. V. GANALA,Pune.




# BECAUSE YOU WANT TO!

*- Vineeta Nagarkar*

**Do you want to learn English? And still have fun?**

**Do you feel that studying English as you do in a classroom is a real bore?**

**Surely there must be a more interesting and enjoyable way of learning this language!**

**Did you ever feel the strain of learning Marathi, or even Hindi? I am sure not.**

**Let us see if we can apply some common principles or methods for learning English.**

Did you ever use a grammar rules book for learning Marathi- Your mother tongue?

What a silly question, isn't it?

Then how did you learn the rules of grammar and get so many words to talk about anything you want to for your present use?

You heard people around you using the language with all its rules, for so many purposes-and so you mentally repeated the same patterns and got the language! It was so easy, wasn't it?

As a baby you first LISTENED then SPOKE, then READ, and finally you WROTE the language!

These are the skills you master.

For the purpose of this article I will suggest some enjoyable methods through which you can develop these skills in English.

LISTENING—

Who will you listen to in English, wherever you are?

1. You can listen to advertisements in English on the radio or T.V.!
2. You can watch T.V. programmes in English. But see that the programme is about a Subject or story of your interest.
3. Listen to the English news on Doordarshan.
4. Listen to stories on tape, with accompanying books, These are ^available in most cities in books and toy shops. They are called audio-books
5. Listen carefully to any people in your town or village who speak in English.

It is possible and very likely that you will not understand much of what you hear-especially if it is on the radio or on a tape without a book with pictures. That is very like a child. But your brain has this fantastic ability to learn the language if it is helped by pictures and actions. If you watch the Good English programmes on TV; Channels like BBC or the 'Discovery Channel'-you will not only enjoy the content but also listen to good English.

If you are a careful listener you are already on your way becoming an able




शिरिष पोंक्षे व प्रसाद पुरंदरे यांच्याकडून प्रबोधकांना शुभेच्छा!

user of the language. So listen to the sounds of this language-some are there in your own language and there are still others- that are familier but slightly different. Listen to these especially and where they come. If you can **hear** the difference then only can you produce the sound correctly. When you **speak.** . Listen also for the order in which

words follow one another. Many simple words and sentences are repeated. These repetitions help you to learn the vocabulary as well as the speaker as well. Both these skills are very closely linked. If you have observed this around you, you will realise the importantce of what I asked you to do while listening. If elders do not use clear and proper language with a child, it is seen that the child will go on speking in 'baby-language' even when he is normal and old enough to speak fluently and clearly!

A priceless source to help you to speak correctly is the dictionary. Every good dictionary gives you the phonetic



grammar. Only on special occasions will you need a dictionary after a TV programme! Language in a TV programme comes as near as possible to language as it is used in various daily situations. This is of special help to you also in your study of Engilsh in school or college as this is English in action! Your understanding of the language will definitely improve as a result of this 'Experience with the language.'

SPEAKING -

'As you listen, so you speak!' If you are a sincere and careful listener you are likely to be a fluent and clear transcription, or the method of saying the word perfectly correctly. If you spend some time in learning to read this script, you can **always** know how to say the word Correctly. It is possible for you to learn this in some अभ्यास शिबिर. You could try and lipk the letters in the script to some of the letters in the Devnagari script to help you. But I must warn you that not all the sounds are available for easy association.

Speaking a language well isn't only speaking the words. You also have to learn the rhythm or the tone in which you say various sentences. This is



छात्र प्रबोधनच्या यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा! 'हेजीब' सौमित्र गोसावी, पुणे.

extremely important to learn. Otherwise the same words can have totally different meanings.

Once again the media will be of great help to you so that you can hear and practice. If you have a tape-recorder you can say sentences and passages in English and listen to yourself or else ask someone else to listen to your speech and correct you.

If you have some audio-books, it is of great help to read-along with the tape to check your own speech pattern!!

Finally - SPEAK WHENEVER YOU HAVE A CHANCE TO! If you speak you will get courage to speak. And after all, if you don't speak the Language, of what use is it? language was meant basically to be spoken!! You will make mistakes in the beginning, but how will you learn without making mistakes? So just go ahead and speak! Improvements will follow.

READING -

Reading in English is perhaps the most problematic of the skills. The main reason for this is that the sounds of English are not often matched by the spelling. By now you must be quite disheartened and may be even depressed because of it. If only the language had followed a phonetic pattern! '

There is however hope stilt! There is a method - called the PHONIC METHOD - of teaching reading at the pre-primary level. This method highlights patterns of spelling and the ways of reading them-It has proved to be highly successful in helping children read correctly and at a remarkable speed. The speed of accurate reading is often so high that a five or six-year-old can read the daily English newspaper of which he understands next to nothing! However, that won't be your condition!

Many of the text books brought out nowadays follow this pattern to teach pronunciation-which aids reading and speaking correctly-and also spelling! The method enables a reader to look at the word as a whole meaningful unit and say it. It ensures a more fluent way of reading.

The Gulmohar reader's series brought out by the Orient Longman publishers as well as some of the more recent publications of the Macmillan press will give you extremely valuable help in this direction. These books are well-graded for difficultly levels as well as interest for the respective age groups.

Reading creates innumerable language experinces for you and makes you repeat sentence patterns and spellings of words in an enjoyable way. This creates a rich store of words and sentences for you to use whenever you want-while speaking or while writing.

Looking at the words in print gives the added bonus to your writing correctly. If you read a lot you will soon be able to identify errors in your own work by simply looking at it. Wrongly spelt words will **look** wrong and your attention will be drawn to correct them. The right patterns are learnt by your brain and come to your rescue when



माशी रोगजंतूंचा नाश करण्यास मदत करते - उदय भवाळकर, पद्म पार्क, पद्मावती, पुणे ९ फोन ४३८९१८

you 'read' your own work! :

While reading your text books look for key words that give you the logical linkages as well as the focus on the content. They should be paid special attention to and memorised if need be. When these words get included in your answers in the examination they tell the examiner that you have understood the topic/ lesson.

**WRITING -**

As you start using English you will realise that you use it mostly to speak and then to write. Until you use these skills you are not communicating your own thoughts. In fact most language courses are now testing whether you can communicate in the language. And becuase in our country such great emphasis is laid on written exams, it becomes most important to master the writing skills.

The present trend in testing the standard of written English is to see how close it is to the normal everyday use of the language. This makes the style very close to the spoken form. Hence if you feel comfortable while speaking you should feel comfortable, about your style of writing most of the times-except of course when you need to write for formal situations. Then you have to learn the format and style which is relatively standard and fixed and can easily be picked up from a number of books available in the market.

While writing for an examination make sure that you **know** the content. Read the question and understand what it is asking for. Answer to the point.

Time is always a major factor in examinations today. If you do not understand the question or the focus of the answer you are not likely to get much credit. Your text-book will only give you a general idea of the kind of work you will be required to do. It is only similar practice, which you will get in developing your understanding through listening or reading, that will earn you credit. So do not ignore written work-whether it is set by your teacher or not. Only when you write will you know what you don't know. It is the only fool-proof way of self-testing. Try it! Nurture the habit. It will get you rich rewards.

And finally a word about your **handwriting.** I believe that even compounders these days do not work with doctors who do not have a legible handwriting! The market is flooded with copy-writing books that allow you a wide choice of style. Choose one that is simple and easy to learn and looks good on a page. The most popular one is known as the Meriou Richardson Script. Use such help to your advantage and have a personal asset you'll be proud of!

When you'ne acquired the basics of the skills, **USE THEM-BECUASE ONLY PRACTICE MAKES PERFECT !**

**

**Vineeta Nagarkar.**
Vishwapradeep.
Kanchanganga Soc.
Bibewadi,
Pune -37



# एका जटायूची झेप

- डॉ. अनुराधा औरंगाबादकर

पंख तुटलेल्या जटायूची त्याला बघितलं की आठवण येते. पंखात असलेल्या सर्व शक्तिनिशी संकटाशी सामना करणारा जटायू आणि प्राक्तन उर्फ सुनील चुंबळे यांचं नातं असं घट्ट विणलेलं.

देखणं रूप, सोनेरी उन्हाचा रंग या जन्मजात देणग्या घेऊन आलेल्या प्राक्तनच्या प्राक्तनात कुबड्या घेऊन चालावं लागण्याचा शापही होता. समोरच्या खुर्चीत जोपर्यंत तो बसला असतो, तोपर्यंत त्याच्या या व्यंगाचा आणि त्याच्या वयाचा अंदाजही येत नाही. कसली तरी स्वप्नं पाहाणारे त्याचे डोळे, त्याच्या मनातल्या झेपेचे प्रतीक बनून येतात. स्वरातलं माधुर्य, त्याच्या पुढच्या आयुष्यातल्या योजना ऐकणाऱ्यावर मोहिनी घालतात. त्याचं अपंगत्व त्याच्या बोलण्याच्या कुठेही आड येत नाही. बोलताबोलता, काही दाखवायला म्हणून जर प्राक्तन उठला, उठताना त्याची जराशी गडबड उडते, तरीही त्याचं व्यंग लक्षात येत नाही. जो जेव्हा कुबड्यांचा आधार घेतो, तेव्हाच ही गोष्ट प्रकर्षानं जाणवते. मनाला खंतावते. त्याचं खरं वय, पानाआडच्या कळीसारखं लपून राहातं. त्याचं वय कळतं, तेव्हा एक आर्त चीत्कार मनातून बाहेर पडतो, 'अरे, किती वर्षे हा प्राक्तन असा अपंगत्वाची शिकार बनून धडपडत जगतोय!' नवीन कल्पनांचा, नवीन योजनांचा सतत ध्यास असलेल्या प्राक्तनला, फार लहानपणीच पोलिओ झाला होता हे कळलं की पुन्हा मनात येतं, नवनवीन भराऱ्या घेण्याची ताकद त्याच्या पंखात कशी टिकून राहिली? नावीन्याचा याचा स्वप्नविहार सतत कसा चालू राहिला? पुन्हा पुन्हा मला त्याच्यात जटायू दिसू लागतो.

लहानपणी कुणाच्या तरी आधारानं प्राक्तनशाळेत जायचा, इतर मुलं खेळ खेळू लागायची, तेव्हा प्राक्तन आभाळाचा निळा रंग बघण्यात रमायचा. झाडांचे बदलते रंग बघत बसायचा, तेव्हाही डोळ्यात स्वप्न तरळत असायची. या अपंगत्वावर मात करून कुणीतरी बनण्याचं त्यानं त्या वयातच निश्चित करून टाकलं होतं.

**नवी झेप**

शाळेचे फुलपंखी रंगाचे दिवस संपले. इथून नवीन पर्व सुरू झालं.

प्राक्तननं अंत:करणात असलेली चित्रकलेची आवड जोपासायचं ठरवलं. त्यासाठी तो मुंबईला गेला. त्या विशाल गर्दीच्या शहरात, त्यानं जे. जे. स्कूल ऑफ आर्ट या इमारतीशी परिचय करून घेतला आणि इथल्याच 'ॲप्लाईड आर्ट' या शाखेशी दोस्ती करून घेतली. या विषयातला डिप्लोमा मिळेपर्यंत तो झुंजत राहिला. मुंबईतल्या गर्दीशी टक्कर देत यश मिळवत राहिला.

**शिक्षणाचं पर्व संपलं.**

प्राक्तनच्या डोळ्यासमोर कर्तृत्वाची



प्रायोजक : ॲडॅप्ट रेकॉर्डिंग इन्स्ट्रुमेंट प्रा. लि. पुणे.


भरारी घ्यायला आकाश मोकळं होतं. पंखात बळ होतं, पण पायात बळ नव्हतं. प्राक्तनच्या गळ्यात हुंदका होता, पण डोळ्यात मात्र स्वप्नांच्य कळ्या उमलत होत्या.

प्राक्तन नाशिकला परतला आणि त्यानतंर स्वप्नांना दिशा शोधायला सुरूवात केली. चित्रकलेची त्याला आवड होती. या आवडीतून त्यानं 'मधुली स्टुडिओ' उभारला. त्याच्या कलेतलं प्रावीण्य नाशिकरांच्या परिचयाचं होऊ लागलं. आर्टिलरी म्युझियममध्ये प्राक्तननं रंगवलेली, 'ऑईल कलर' मधली तैलचित्रे मुद्दाम मागवून घेऊन लावण्यात आली. अशी एका पाठोपाठ अकरा चित्रे प्राक्तननं करून दिली आणि ती गौरवपूर्वक म्युझियममध्ये लावण्यात आली. यामुळे प्राक्तनचा आत्मविश्वास वाढला. नाट्य, चित्रपट, संगीत, अभिनय या कलांची आवड असलेलं त्याचं मन अधिक भराऱ्या मारण्यासाठी आकाश शोधत राहिलं.

चित्रपटासाठी लेखन करण्याचं आणि दिग्दर्शन करण्याचा त्याचं एक स्वप्न रहातं. हे स्वप्न, सत्यरूप घेऊन उतरलं – १९८१ साली. 'अ डे इन शिर्डी' नावाची एक रंगीत फिल्म त्यानं प्रयत्नपूर्वक बनवली. शूटिंग करतान कुठंही कंटाळणं नाही, तास् न तास उभं राहावं लागलं तरी कुरकूर नाही, पाय दुखायला लागल्याची कटकट नाही. चहा–बिस्कीट एवढं जेवण त्याला पुरायचं. पहाटेपासून सतत रात्रीपर्यंत काम करण्याची त्याची शारीरिक शक्ती ही त्याच्या मनोबलातून त्याला लाभली होती.

याच मानसिक शक्तीच्या जोरावर तो पंख पसरून विहार करू लागला. त्यानं महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवासाठी नाटक दिग्दर्शित केलं ८४ साली, आणि इथंही त्याच्या गौरवात एक तुरा खोवला गेला. उत्कृष्ट दिग्दर्शनाचं पारितोषिक त्याला मिळालं. मग सतत नाट्यदिग्दर्शन तो करीत राहिला. एका शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनासाठी तो नाटकं बसवू लागला.

मधल्या काळात यानं एक उत्तुंग झेप






मोकाशी कुटुंबियांकडून हार्दिक शुभेच्छा!

घेतली. १९८१ साली हे 'अपंग वर्ष' म्हणून जाहीर झालं होतं. तेव्हा प्राक्तननं 'इन्हे संभालिये' नावाची, एका रीळाची डॉक्युमेंटरी फिल्म तयार केली यात कुठेही संभाषण नाही, निवेदन नाही, एकही संवाद नाही. फक्त पार्श्वसंगीत आणि परिणाम साधणऱ्या पाच दृश्यांची अप्रतिम गुंफण यातून फुलत गेलेली ही फिल्म. कॉलनी, अरूंद रस्त्यावरून धावणारी भरधाव गाडी, मध्ये मुलगा येतो म्हणून ड्रायव्हर जोरजोराने हॉर्न वाजवतो, तरीही मुलगा बाजूला होत नाही , ड्रायव्हर संतापतो, मुलाला मरायला धावतो आणि थबकतोच.... कारण? मुलगा बहिरा आणि मुका आहे-- हे दृश्य असलेली डॉक्युमेंटरी दूरदर्शनवरून बघताना काळीज चिरत गेली. पुढचं दृश्य – बाई रस्त्यावरून कचरा फेकते, त्यातल्या काचा मुलीच्या पायात शिरतात. ती आंधळी असते. अपंगांच्या समस्या अशा प्रभावीपणे मांडणाऱ्या या 'डाक्युमेंटरी'ची निवड त्या वर्षीच्या तेवीस फिल्ममधून करण्यात आली होती, हे कळलं की प्राक्तनच्या कलासाामर्थ्याची कल्पना येते.

**क्रियाशील कलाकार**

आता प्राक्तच्या दैवगतीचं चक्रवेगानं फिरू लागलं. नाशिक मेडिकल फौंडेशनसाठी यानं कुष्ठरोगावर एका रीळाची डॉक्युमेंटरी तयार केली. ही प्रचारकी स्वरूपाची होऊ नये म्हणून प्राक्तननं यात गरीब व श्रीमंत अशा दोन मुलांची गोष्ट गुंफली. हा रोग लपविण्याची श्रीमंतांची वृत्ती कशी घातक आहे आणि वेळीच उपचार झाले तर हा रोग बरा कसा होऊ शकता याचं विलक्षण प्रत्ययकारी दर्शन या फिल्मकधून घडतं.

प्राक्तननं 'फिल्म' साठी हाताळलेले विषय असे समस्याप्रधान आहेत. आज त्याच्या टेबलावर मतिमंद मुलांची समस्या हाताळणारी फिल्म आहे. Spastic Child म्हणजे मज्जातंतू कमकुवत असलेल्या मुलांच्या समस्या हाताळणाऱ्या या फिल्मचं नाव त्यानं ठेवलंय 'नन्ही कलियाँ' हा अनुबोधपट सर्व भाषांत केला गेला व तो नुकताच भारतभर प्रदर्शित झाला.





A. V. BHAT HOUSING COMPANY, 1348 Sadashiv peth, Pune 30.

प्राक्तनच्या फिल्म प्रभावी ठरतात त्याचं कारण त्याची या क्षेत्रातली जाणकारी! कॅमेऱ्याची भाषाही त्याला समजते. प्राक्तनच्या गौरवाची गाथा इथपर्यंतच सीमित नाही. उकृष्ट दिग्दर्शक, चित्रकार, याचबरोबर त्यानं नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते, उत्कृष्ट गायक म्हणूनही पारितोषिक मिळवल आहे. पुण्याच्या जेसीस् या संस्थेने त्याच्या 'सर्वोत्कृष्ट तरूण कलाकार'असा गारैव केला आहे. अपंग असूनही जराही दुर्मुखलेला न राहाता सतत धडपड करणाऱ्या, उत्साही आणि आनंदी व्यक्तिमत्त्वाच्या प्राक्तनचा, सुनील दत्तच्या हस्ते, 'अपंग असूनही क्रियाशील कलाकार'म्हणून सत्कार झाला आहे.

अशी सत्काराची सुगंधी फुलं प्राक्तनच्या दारात खूपदा उगवली, पण प्राक्तन अजून समाधानी नाही. अंगात गुण असूनही अपंगत्वामुळे, झेप घ्यायला पंखातलं बळ कमी पडतं ह्या खंतीबरोबरच त्याच्या मनात अजून एक खंत आहे. त्याचं अपंगत्व त्याच्या आत्मविश्वासाच्या आड येत नसलं तरी लोकांना मात्र त्याच्या शक्तीवर विश्वास टाकताना साशंक व्हायला होतं, हे शल्य त्याला बोचत आहे. हिरा ओळखणाऱ्या एखाद्या जवाहिऱ्याची नजर प्राक्तनावर पडायला हवी आहे.

अपंगत्वाचं भांडवल न करता प्राक्तनचं झेप घेणं चालू आहे. एक पंख तुटलेला आहे, तरीही जटायूसारखं पुढे-पुढे झेपावणं सुरू आहे. सध्या तो 'कर्णबधिर मुलांचे पुनर्वसन याविषयावरील 'सुबह का तारा' या अनुबोधपटाच्या निर्मितीत गुंतलाआहे. दूरदर्शनसाठी 'जमवलं की जमतं' ही मालिका तयार केली आहे. 'झी' टिव्हीसाठी सव्वीस भागांची हिंदी मालिका तयार करण्याचं काम चालू आहे. अनुबोधपटाचे खूप विषय त्याच्या मनात तयार आहेत.

प्राक्तन चुंबळे या जटायूची झेप घेणं असंच चालू आहे. त्याचं कौतुक करण्यासठी त्याला शाबासकी देण्यासाठी म्हणू या प्राक्तन तुला अनेकानेक शुभेच्छा!

आगे बढो.

**

**अनुराधा औरंगाबादकर**
४ शाल्मली, पारिजात सोसायटी
पारिजातनगर, नाशिक-५

### *वर्ष ५ अंक ६*
### *घोषवाक्य स्पर्धा निकाल*

***सर्वोत्कृष्ट शीर्षक आणि घोषवाक्य***
***शंखनाद***

*सज्ज व्हावया शत्रूपासून,*
*शंखनाद तो होत असे,*
*भवितव्याचा वेध घेऊन*
*सान छकुला सज्ज असे.'*

***- वैशाली माडजे, धाराशीव,***

*वर्ष संपले जुने, नवी पहाट होतसे*
*बिगुलाचा घोष आता दशदिशांत घुमतसे,*
*उभ्या जगाला तारण्या समर्थ हो! सशक्त हो!*
*भारताला ने पुढे हाक हीच देतसे*


***उत्तेजनार्थ :- जाह्नवी लिमये, पुणे***



MICROVERSE AUTOMATION (P.) LTD. for Automation, Requirements of process plant.

# हिवाळ्यातील फुलोरा

– डॉ. कांचनगंगा गंधे



***मार्गशीर्ष संपता संपता आणि पौष चालू झाल्यावर आंब्याचा मोहोरही मोहरून उठतो. पानांच्या दाटीवाटीमुळे अगदी प्रथम डोळ्यांना न दिसणारा, पण नंतर जसजसा वाढायला लागतो तसतसा पानांच्याही वर येऊन ताठ उभा राहणारा 'आंब्याचा मोहोर' म्हणजे 'शिरपेच' लावल्यासारखाच दिसणारा! पिवळसर रंगाची छोटी छोटी फुलं एका छोट्या काडीवर आणि त्याला फुटणाऱ्या उपकाड्यांवर एकदम मोहरून आली की झालेल्या आनंदाचं वर्णन कसं करावं?***

मार्गशीर्ष, पौष महिन्याचे दिवस म्हणजे थंडीचे दिवस, पानगळीचे दिवस. बऱ्याचा वृक्षांची पानं याच महिन्यात गळतात, त्यामुळे वृक्षवृष्टी स्पष्ट दिसते. अशा निष्पर्ण वृक्षांकडे पाहिल्यावर आधीच लहान असलेला दिवस आणखी लहान वाटायला लागतो. मार्गशीर्ष महिन्यातली थंडी कडाक्याचीच पण हवीहवीशी वाटणारी, दुपारची उन्हं तापली तरी दिवसभराच्या थंड वातावरणामुळे बरीचशी सुखद वाटणारी. आपल्याला जसा हा महिना हवाहवासा वाटतो, तसा बऱ्याच फुलझाडांना, मोठ्या वृक्षांना आणि पक्ष्यांनाचही. आपली ही आवड दाखविण्यासाठी वनस्पती मोहरून उठतात. स्वत:चे रंग दाखवण्यात त्यांच्यात चढाओढच लागते. मोठे वृक्ष पानगळ झाल्यावर हा आनंद व्यक्त करण्यासाठी आणि स्वत:चे अस्तित्व दाखविण्यासाठी निरनिराळ्या आकाराचे आणि रंगाचे स्वत:कडचे पुष्पालंकर बाहेर




प्रायोजक : बजेट कन्स्ट्रक्शन, १०२ 'वीरशांती', क्रांती चौक, औरंगाबाद.

काढतात. छोटी फुलझाडं मात्र रंगीबेरंगी पुष्पालंकाराबरोबर हिरव्या पानड्याही अंगावर मिरवत आपला आनंद व्यक्त करतात. आधीच उत्साही असलेल्या वातावरणात या रंगफुलांनी जास्तच उत्साह येतो. निसर्गातल्या ह्या रंगांची उधळण पाहायाला मनानी तिकडे धाव घेतली नाही तर नवलच!

लाल, केशरी रंगाची, शंकूच्या आकारात, वासुदेवाच्या टोपीसारखी, बरीच फुलं एकत्रित असलेलं हे पिचकरीचं झाड, फुलं आली की हे झाड एकदम छान दिसायला लागतं. एरवी हे झाड तसं फारसं देखणं नाही. फुलं फांद्यांच्या टोकांवर येतात, शंकूचा आकार असलेला हया लाल, केशरी फुलांच्या गुच्छातली सर्वात खालची फुलं अगोदर उमलतात.

फुलं उमलली की जणू छोटी तुतारीच वाटते. एखादा छोटा पेलाच उमलल्यासारखा दिसतो. म्हणून याला इंग्रजीत 'ट्रम्पेट ट्री' म्हणतात. पुढे निसर्गात होणाऱ्या रंग उधळणीची ललकारी देण्यासाठीच ही फुलं उमलत असावीत. कळ्यांमध्ये निसर्गात पाणीही असतं. कळी दाबली की आतलं पाणी पिचकारीसारखं उडतं, म्हणूनच त्याला 'पिचकारीचं झाड' ही म्हणतात. कळीतलं हे निसर्गजल प्यायला साळुंक्या, चिमण्या, भोड्याही या झाडाला भेट देतात. काही दिवसातच बोटं उभी केल्यासारख्या फळांच्या जणू होड्याच झाडावर दिसायला लागतात. हिरव्या फळांचे हे सौंदर्यही पाहण्यात काही औरच मजा असते. थोड्याच दिवसात फळं तपकिरी होतात, होडी उकलते आणि आतल्या पातळ, पंखांच्या बिया वाऱ्याबरोबर सगळीकडे पसरतात. ह्या बिया फळात अगदी शिस्तबद्ध पण दाटीवाटीने बसलेल्या असतात. पण एकदा



का फळ उकललं की त्यांची शिस्त बिघडते. नेईल त्या दिशेनं त्या निघून जातात. मग फळाचे मोकळे कवच बराच काळ एकदेच झाडावर तसेच राहते.

निष्पर्ण झाडाच्या टोकला, छोट्या फांद्यांवर पिवळी फुलं फुललेलं हे कणेरीचं झाड. झाडाचं खोड तसं फिकट तपकिरी रंगांचं आणि गुळगुळीत. फुलं छोट्या फांद्यांवर उपफांद्या फुटून जरा अंतराअंतरानं उगवलेली. कळी अगदी टपोरी, लव असलेली. कदाचित् मार्गशीर्ष महिन्याच्या थंडीपासून आतल्या नाजूक पाकळ्यांचा बचाव करण्यासाठीच वाढलेली असावी. लव मातकट, पांढरी पण अगदी मऊसूद.

फुलं उमलली की पिवळ्याधमक पाकळ्या आपलं लक्ष वेधून घेतात. लांबूनही हया पाकळ्या नाजूक दिसतात. झाडांवरील फुलं काढली की लगेच सुकायला लागतात. पाकळ्यांवर हिरव्या रंगांच्या पुसटश्या रेघाही असातात. ह्या फुलाचं खरं सौंदर्य त्याच्या पूंकेसरात आहे. बावनकशी सोनं तापवल्यानंतर जसं तांबूस लाल दिसतंना तसे हे पूंकेसर फुलाच्या मध्यभागी विराजमान झालेले असतात. अशा या बावनकशी सोन्याच्या फुलांकडे मधमाश्या आकर्षित न झाल्या तरच नवल! थोड्याच दिवसात ह्या सोन्याची *रूपेरी फळं* तयार होतात. 'नैवद्याची गोल चांदीची वाटी' वाटावी अशी फळं झाडावर दिसतात. फळं उकलली की आतून पांढरा, मऊसूत कापूस बाहेर पडतो. कापसाच्या गादीत एक बी असते. वाऱ्यामुळे दुसरीकडे जाऊन पडते आणि 'योग्य वातावरण' 'योग्य जमीन' मिळाली की बिया आपलं बस्तान तिथच बसवतात.

पिचकारी आणि गणेरीपेक्षा कमी आकर्षक पण स्वत:चं वेगळ जपणारं हे चेडूफळीचं आणखी एक झाड. त्या दोन्ही झाडांपेक्षा हे झाड खूप मोठं होतं, त्याचा वृक्षच होतो. खोडाचा घेरही खूप मोठा. हिवाळ्यात त्या वृक्षाच्या फांद्यावर छोटे छोटे चेंडू लटकल्यासारखे दिसतात. लिंबाच्या आकाराएवढी, आणि आकारासारखी ह्या वृक्षाची फुलं. अगदी लहान लहान पिवळसर फुलं अगदी दाटीवाटीनं एका गोलाकार भागावर बसलेली, त्यामुळे दुरून एकच फूल आहे की काय असं वाटावं! फुलं इतकी उंच



**लेडिज् लेस**

असतात की लांबून त्याची शहानिशा करणं जरा अवघडच असतं! पण हे छोटे चेंडू खाली पडतात तेव्हा त्याचं खरं स्वरूपही कळतं. छोटी फुलं गळली की आतले गोल गडद तपकिरी रंगाचे असतात हेही स्पष्ट दिसतं.

हिरव्यागार गुळगुळीत खोडाचं, झाडाच्या वरच्या भागांवर बऱ्यापैकी शिस्तीत वाढलेल्या फांद्यांचं हे 'सिबाचं' झाड. फुलं यायच्या आधी निष्पर्ण झाल्यामुळे 'वृक्षयष्टी' एखाद्या 'फ्लॉवरपॉट' सारखी दिसते. थोड्याच दिवसात या 'फ्लॉवरपॉट' वर फिकट, थोडीशी निस्तेज पिवळसर फुलंही उमलतात. फुलांचे देठ जरा जाड, आणि मोठे असल्यामुळे फुलं जमिनीकडे तोंड करून उभी राहिल्यासारखी दिसतात. थोड्याच दिवसात 'सोनकेळ्या' एवढी त्याला फळंही लोंबायला लागतात. त्यात बियांवर लगडलेला मऊ कापूसही असतोच. स्वत:च्या वंशवृद्धीची काळजी निसर्गातला प्रत्येक सजीव घेतच असतो. वाऱ्याच्या छोट्या झुळकीनं आतली बी कापसासकट एखाद्या विमानात बसल्यसारखी दुसरीकडे जाते, रूजते आणि पुढच्या वंशवृद्धीसाठी पुन्हा हळुहळू वाढत राहते.मार्गशीर्ष संपता संपता आणि पौष चालू झाल्यावर आंब्याचा मोहरही



बुद्धिचे १२० पैलू उलगडून सांगणारे पुस्तक 'बुद्धिवैभव' किंमत २० रू संपर्क 'छात्र प्रबोधन' प्रकाशन.

मोहरून उठतो. पानांच्या दाटीवाटीमुळे अगदी प्रथम डोळ्यांना न दिसणारा,पण नंतर जसजसा वाढायला लागतो तसतसा पानांच्याही वर येऊन ताठ उभा राहणारा 'आंब्याचा मोहोर' म्हणजे 'शिरपेच' लावल्यासारखाच दिसणारा! पिवळसर रंगाची छोटी छोटी फुलं एका छोट्या काडीवर आणि त्याला फुटणाऱ्या उपकाड्यांवर एकदम मोहरून आली की झालेल्या आनंदाचा वर्णन कसं करावं?

मार्गशीर्ष संपत आला की 'धुक्याचा महाल' पौषाची आठवण करून देतो, शेतातली गव्हाची पिकं दवबिंदूना घेऊन आनंदाने डुलत असतात. गव्हाच्या लोब्यांवरचे दवबिंदू म्हणजे अगदी मोत्यांची मळच जणू! पौषातलं 'दव' पिऊन घाटेदार झालेलं, गोड चव असलेलं शेतातलं हे दुसरं हरभऱ्याचं झाड! फूट दीड फूट वाढणारं! पानांवर लव असलेलं पोपटी हिरव्या रंगाचे 'घाटे' म्हणजे आपल्या शेतातलं जणू 'हिरवं सोनं! झाड काढलं तरी जमीन सुपीकच राहिलेली. खरंच या छोट्या झाडाकडून घेण्यासारखं बरचं काही आहे.

बागेतल्या तर फुलझाडांच्या रंगसंगतीचे आणि रंगउधळणाचे वर्णन करावे तेवढे थोडेच! ही नाजूक पाकळ्यांची आणि पांढऱ्या, गुलाबी, तांबड्या, केशरी पिवळ्या रंगांची 'गार्डन पॉपी.' रंग तर नुसते बघतच राहावेत. फुलांचा एकत्रित फुललेला ताटवा तर नजरच हलू देत नाही इतका देखणा दिसतो. जणू विविध रंगांची फुलपाखरं काड्यांवर चिकटवली आहेत की काय असं वाटावं! तोडून घ्यायला गेलं तर सर्वच गळून पडतात. ह्या पॉपीबरोबरच दुसरी बोगत फुलणारी फुलझाडं म्हणजे पिंक किंवा डायॉन्थन्स. फुलं आली की त्यांचं वर्णन कोणत्या शब्दात करावं हेच समजेनासं होतं. फक्त डोळे भरून पाहावं आणि तृप्त व्हावं एवढंच! फुलांच्या पाकळ्या आणि त्याच्यावरच्या नक्षीकामाचं कौतुक करावं तेवढं थोडंच! ह्याच्याच बरोबर आणखी एक फुलझाड म्हणजे 'लेडीज लेस.' पांढरी, अगदी छोटी फुलं दाटीवाटीनं पण छत्रीच्या आकरात वाढलेली लेडीज लेसची नाजूक फुलं आपलं मन मोहून टाकतात. पांढऱ्या छटांमध्ये शुभ्र पांढरा 'आयबेरीस' फुलला की पांढरी चादरच अंथरल्यासारखी दिसते. याची फुलं गुच्छात येतात. मधमाश्यांना आणि इतर किड्यांना फुलातला मध नीट चोखता यावा म्हणून प्रत्येक फुलातल्या चार पाकळ्यांपैकी एक पाकळी जरा मोठी, जणू त्यांना भेटायला आलेल्या अतिथीचं स्वागत करायला पाटच मांडलेले. बागेतल्या फुलझाडांच्या सौंदर्याचा कळस म्हणजे जेव्हा 'सॅपोनारिया' फुलतो तेव्हा! जांभळट गुलबट रंगांचं मिश्रण असलेल्या फुलांचे ताटवे फुललेले पाहिले की खरोखरच डोळ्यांचं पारणं फिटतं!

निसर्गातल्या या रंगांचं सौंदर्य, थंडी आणि त्याच्या जोडीला असलेलं धुकं यांचा त्रिवेणी संगम या मार्गशीर्ष पौष महिन्यात दडलेला आहे.

**

**डॉ. कांचनगंगा गंधे**
४१/६६७ लोकमान्यनगर, पुणे ३०.



गिर्यारोहणाची प्रेरणा निर्माण करणारे पुस्तक 'गिर्यारोहण गाथा' किं. ४० रु. संपर्क 'छात्र प्रबोधन' प्रकाशन.




✻ मार्क ट्वेनबरोबर एकदा काही साहित्यिक शेक्सपिअरच्या नाटकांची चर्चा करीत होते. चर्चा चालू असतांना शेक्सपिअरची नाटके त्याने स्वत:च लिहिली की दुसऱ्या कोणी लिहून शेक्सपिअरच्या नावावर छापली असा वाद सुरू झाला.
मार्क ट्वेन शेवटी कंटाळून म्हणाला, ''मी स्वर्गात गेल्यावर खुद्द शेक्सपिअरलाच हा



प्रश्न विचारीन.''
''परंतु शेक्सपिअर स्वर्गातच कशावरून असेल? तो नरकात असण्याची शक्यता आहे'' एका व्यक्तीने वाद चालू ठेवला.
''असे असेल तर तुम्ही त्याला तो प्रश्न विचारा.'' मार्क ट्वेनने हसत हसत उत्तर दिले.
✻ लेफ्टनंट कर्नल कार्लेकर रेल्वे स्टेशनवर उतरले. त्यांनी पाठविलेला संदेश मिळाला नसल्याने जीप घ्यायला आलेली नव्हती. त्यांनी छावणीत फोन केला, ''मै मुंबईसे कार्लेकर आया हूँ। जीप भेज दो।'' सैन्यात प्रत्युत्तर करायचा रिवाज नसल्याने



उपस्थित जवानाने 'जी साब' असे म्हणून फोन ठेवला. एक तास उलटून गेला तरी जीपचा पत्ता नसल्याने ले. कर्नल कार्लेकरांनी पुन्हा फोन केला व ते संतापाने म्हणाले, 'जीप अभी तक क्यों नहीं भेज दी गयी?' तो जवान कसाबसा उत्तरला, 'साब अगर आप 'कार लेकर' आए है तो भी आपको जीप क्यों चाहिए? यहीं मै एक घंटेसे सोच रहा हूँ।'

✻ एका शहारातील माणूस खेडेगावात राहण्यासाठी आला. तो गावातील सरपंचास म्हणाला, ''प्रामाणिकपणे जीवन जगावं म्हणून मी शहर सोडून मुद्दाम येथे स्थायिक होण्याचे ठरवले आहे''
''फारच छान! आपल्याला दुसरा कोणीही स्पर्धक येथे असणार नाही'' सरपंचांनी आपला अभिप्राय व्यक्त केला.

*******************



उपासनेच्या विविधांगी उपयोगांची प्रयोग माहिती देणारे पुस्तक 'उपासनेद्वारा व्याधीमुक्ती' किं. १६ 'छात्र प्रबोधन' प्रकाशन.

## वाचलेच पाहिजे असे काही

# खरे मास्तर

**– प्रा. शैलजा देशमुख**

१९३३ साली 'कळ्यांचे नि:श्वास' हे पुस्तक प्रकाशित झाले आणि या पुस्तकातील निखळ वास्तवतेच्या दर्शनाने महाराष्ट्रभर खळबळ माजवली. स्त्रियांचे यापूर्वी टाळले गेलेले प्रश्न मालतीबाई बेडेकर यांनी 'विभावरी शिरूरकर' या टोपणनावाने प्रकाशात आणले. त्यानंतर 'हिंदोळ्यावर', 'बळी,' 'शबरी' इ. पुस्तकातूनही वेगवेगळ्या समस्यांचे चित्रण लेखिकेने केले. त्यांची अलिकडेच प्रसिद्ध झालेली 'खरेमास्तर ' ही चरित्रात्मक कादंबरी. मात्र या सर्व पुस्तकांपेक्षा वेगळी, परंतु त्यांच्या समृद्ध साहित्यनिर्मितीतील एक अतिशय मोलाची भर.!

'खरे मास्तर' हे लेखिकेचे वडील. पहिल्या प्रकरणात ही कादंबरी लिहिण्याची प्रक्रिया आपल्या मनात कशी सुरू झाली याची पार्श्वभूमी लेखिका मांडते. दुसऱ्या प्रकरणात त्यांच्या वडिलांच्या घडत जाण्याचा सुरूवातीचा काळ त्यांनी लिहून ठेवलेल्या आत्मकथनातून मांडला आहे तर तिसऱ्या प्रकरणापासून कादंबरीची खरी सुरूवात होत. मात्र त्यातील सर्व घटना या वेगवगेळ्या व्यक्तींच्या स्मरणांवर आधारित आहेत.

गुहागरमधील नारळीपोफळींच्या बागेतील सुखी तृप्त, प्रापंचिक जीवन कर्त्या पुरूषाच्या निधनाने एका दिवसात उद्ध्वस्त होते. संवेदानक्षम मन असणारा १०-१२ वार्षाचा छोटा अनंता आपल्या आईचे केशवपन झालेले रूप पाहून भयचकित होतो. त्यानंतर मुंबईत फाटकमामांच्या आश्रयाने उदरनिर्वाह करतो, शिकतो, आगरकरांचे सुधारकी विचार ऐकून प्रभावित होतो. लग्नानंतर घोडनदीच्या मिशनरी शाळेत चित्रकला शिक्षक म्हणून नोकरीला लागतो. येथे 'खरे मास्तरांच्या'व्यक्तिमत्त्वाला आकार येऊ लागतो. पत्नीला शिकवण्यासाठी ते लोकांचा विरोध पत्करतात. आपल्या मुलींना




शिकवण्याचा आग्रह धरतात. पत्नीला नावाने हाक मारणे यासारख्या छोट्याछोट्या प्रसंगातून प्रवाहाविरूद्ध जाण्याचे त्यांचे धाडस



''पंख सुरांचे'' ही छात्र प्रबोधन निर्मित ध्वनिफीत आवर्जून ऐका, किंमत ४०/-

दिसून येते. स्वत:च्या ठाम मतांचा ते आग्रह धरतात, त्याप्रमाणे कृती करतात.

आपल्या वडिलांचे हे लोकविलक्षण व्यक्तिमत्त्व लेखिकेला भावलं होतं. विवेकबुद्धीला अनुसरून निर्भीडपणे वागणे या त्यांच्या गुणाचं कौतुक होतं.पुरेसं शिक्षण नव्हतं पण चित्रकलेच्या भांडवलावर त्यांनी आपला प्रपंच नेटका उभा केला होता. पगारात कपात झाल्याने कुटुंब चालवणे अवघड झाल्यावर ते सरळ दूधविक्रीचा धंदाही करतात.


खरे मास्तरांना तत्कालीन सामाजिक स्थितीचं भान होतं. ख्रिश्चन लोक चर्चमध्ये प्रार्थनेसाठी एकत्र येतात पण सगळे हिंदू मात्र देवळात एकत्र येत नाहीत. या धर्मात अनेक जाती आहेत. त्यांत उच्चनिच्चताही आहे, दैवतंही वेगवेगळी आहेत म्हणून एक खाजगी बैठकीत सर्व जातीच्या लोकांना मंदिरात प्रवेश मिळायला हवा असा विचार ते मांडतात. अर्थात् हा विचार प्रतिगामी खोडून काढतात. मध्यमवर्गीय असणाऱ्या खरे मास्तरांचं मोठेपण कुणाला कळलंही नाही. गावात आलेल्या ढोंगी साधूला पळवून लावण्याचं धाडस त्या काळात खरे मास्तरांनी दाखवलं होतं. स्वधर्माविषयीची त्यांची निष्ठा कणखर होती. धर्मांतराच्या आग्रहाला ते बळी पडले नाहीत. सर्व मुलींनी उच्चशिक्षित असावे यासाठी ते धडपडतात. यापुढील भागात आपल्या भावंडांच्या आयुष्यातील घटना थोडा फार बदल करून लेखिका मांडते. हे निवेदन अतिशय नाट्यपूर्ण आहे.

आयुष्यभर सचोटीने तत्त्वासाठी झगडणाऱ्या खरे मास्तरांचे शेवटचे दिवस मात्र एकाकी जातात. पक्षाघातासारख्या दुखण्याने बोलणे अशक्य होते. केविलवाणी अवस्था होते ते अंतर्मुख बनतात, आत्मचिंतन करतात. एक सतत धडपडणारी कर्तव्यनिष्ठ, तत्त्वप्रिय अशी व्यक्तिरेखा या कादंबरीतून आपल्यापुढे येते. आपल्या वडिलांविषयी लेखिकेला आदर आहे, कृतज्ञता आहे परंतु भावनांचे अवाजवी प्रदर्शन येथे नाही. वडील जसे भावले, समजले तसे येथे चित्रित केलेले आहे. लेखिकेची समतोलवृत्ती, प्रगल्भता, अलिप्तपणे चित्रण करण्याची ताकद या गुणांमुळे या कादंबरीला उंची लाभली आहे. ''काही दिवसातच खरे मास्तर गेले.'' या छोट्या वाा्क्याने हे पुस्तक संपते. पण त्यांतील भावनांची अबोल खोली, त्यांच्या मनातील पितृऋणाची भावना, प्रांजळ व्यक्तिचित्रणं,तत्कालीन समाजस्थितीचे नकळत होणारे दर्शन यामुळे ही कादंबरी मराठी वाचकांनी वाचायलाच हवी अशी लक्षणीय ठरते!

**खरे मास्तर**
**लेखिका – विभावरी शिरूरकर**
**प्रकाशक – पॉप्युलर प्रकाशन**
**किंमत – ७० रू.**

**

**प्रा. शैलजा देशमुख**
गुरूराज हौ. सो.
पुणे ३७.





छात्र प्रबोधन मासिकासाठी जाहिराती मिळवून द्या. दर-अर्धे पान रु. ९००/- पूर्ण पान रु. १,५००/-



## जरा डोके चालवा

प्रा. विसरभोळे रस्त्यावर पार्क केलेली गाडी तशीच विसरून चालत घरी आले. घरी आल्यावर पत्नीने आठवण करून देताच, ते लगेचच गाडी ज्या रस्त्यावर पार्क केली होती तिथे पोचले. पण गाडी तर गायब. तसेच ते तडक पोलीस चौकीवर गेले. तिथे असलेल्या इन्स्पेक्टरकडे तक्रार नोंदवताना गाडीचा मेक, रंग, इतर सर्व खाणाखुणा सांगून झाल्या. 'गाडीचा नंबर काय?' ह्या प्रश्नाशी मात्र प्रा. विसरभोळे अडखळले. 'तेच तर आठवत नाही' पण हां! नंबर चार आकडी आहे. चारही आकडे विषम आहेत. कोणत्याही आकड्याची पुनरावृत्ती नाही. तसेच पहिला आकडा शेवटच्या आकड्यापेक्षा २ ने मोठा आहे...... प्राध्यापकांनी कोडेच घालायला सुरुवात केल्यावर इन्स्पेक्टर डोक्याला हात लावून बसला.

इतक्यात प्राध्यापक म्हणाले, 'अजून एक मजा तर सांगायचीच राहिली. माझ्या मुलाच्या मोटारसायकलचा नंबर उलटा केला तर माझ्या मोटारीचा नंबर मिळतो. 'वा छान! लवकर मुलाच्या मोटारसायकलचा नंबर सांगा.' इन्स्पेक्टर हर्षातिरेकानं म्हणाला, 'छे हो! माझ्या गाडीचा लक्षात नाही राहात तर त्याच्या गाडीचा काय लक्षात राहणार? हं! पण एक आठवतंय की, त्याच्या आणि माझ्या मोटारींच्या नंबरांची बेरीज बरोबर १६४५६ एवढी येते. झालंच तर माझ्या नंबरातला उजवीकडून दुसरा अंक डावीकडून दुसऱ्या अंकापेक्षा मोठा आहे.'

'आता इतकं आठवतंय-तर तेवढा मोटारीचा नंबर....' इन्स्पेक्टर तोंडातल्या तोंडात पुटपुटला आणि कागदावर आकडेमोड करू लागला. पण छे! कोडं सुटेना. तुम्ही करता का जरा इन्स्पेक्टरला मदत?

### उत्तर

प्राध्यापकांच्या गाडीच्या नंबराच्या उलट त्यांच्या मुलाच्या गाडीचा नंबर आहे. त्यांच्या गाड्यांच्या नंबराची बेरीज १६४५६ आहे. म्हणजेच प्राध्यापकांच्या गाडीच्या नंबरापैकी सहस्रस्थानावर व एकक स्थानावर असलेल्या अंकांच्या बेरजेत एकम्स्थानी ६ हा अंक हवा.

```
  ९--७ प्राध्यापकांच्या गाडीचा नंबर
+ ७--९ मुलाच्या गाडीचा नंबर
 १६४५६
```

असे दोन विषम अंक म्हणजे ९ व ७ हे आहेत व पहिला अंक शेवटच्या अंकापेक्षा २ ने मोठा आहे. म्हणून एकम् स्थानी ७ व सहस्रस्थानी ९ आहेत. आता मधील २ अंक शोधू. आता दशम् स्थानच्या अंकांची बेरीज केली तर त्या बेरजेत एकम्स्थानी ४ यायला हवेत (हातचा एक आहे). असे विषम अंक म्हणजे १ व ३ हे आहेत. परंतु उजवीकडून दुसरा अंक डावीकडून दुसऱ्या अंकापेक्षा मोठा आहे. म्हणून दशमस्थानी ३ व शतम् स्थानी १ आहेत. म्हणून गाडीचा नंबर ९१३७ आहे.



'असे घटते सुंदर अक्षर' हस्ताक्षराची कृतिपुस्तिका, छात्र प्रबोधन प्रकाशन.

# ७० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन वृत्तांत

**– प्रतिनिधी**

बाळे, मराठी माणसाच्या दृष्टीने गौरवास्पद असलेल्या अनेक बाबींपैकी एक म्हणजे अ. भा. मराठी साहित्य संमेलन. अ.भा. म्हणजे अखिल भारतीय बरं का? महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदारांची मराठी भाषेबद्दलची अष्टसूत्री तू जरूर वाच. तिचं मनन कर. द. वा. पोतदारांनी म्हटल्याप्रमाणे, 'स्वजनांना मान, ध्यान आणि प्रमाण द्यायचे काम संमेलने करत असतात.' समाज, साहित्य आणि उद्याची दिशा ह्या तिघांचा मेळ घालण्यासाठी ही साहित्यसंमेलने भरत असतात. यंदाचे मराठी साहित्य संमेलनाचे सत्तरावे अधिवेशन नगर येथे झाले. नगर जिल्ह्यातच ज्ञानेश्वर महारांनी 'पैस' येथे आपले आध्यामित्मक अधिष्ठान केले म्हणूनच 'पैस' मूर्ती हे संमेलनाचे शुभंकर ठरविण्यात आले आणि संमेलन नगरीला 'श्री संत ज्ञानेश्वरनगर' असे नामाभिधान देण्यात आले. तीन दिवस मराठी साहित्यातील ज्ञानियांनी चर्चा, परिसंवाद, मुलाखती, भरवून नगरकरांना मराठी भाषेच्या समृद्ध वाङ्मय परंपरेचे दर्शन घडविले.




**पैस मूर्ती**

बाळे; तू झेप, झुंज, मंत्रावेगळा ह्या ऐतिहासिक कादंबऱ्या वाचल्या असशीलच. त्याचे लेखक आहेत ना. सं. इनामदार. तेच यंदाच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बरं. अध्यक्षपदासाठीचे इच्छुक उमेदवार श्री. दया पवार यांचे अकस्मात निधन झाल्याने यंदा पहिल्यांदाच अध्यक्ष पदाची निवडणूक 'दोनदा' घोषित करण्यात आली. त्यात रसिक चाहत्यांनी बुजुर्ग 'नासं' ना पसंती दर्शवून बहुमताने अध्यपदाचा बहुमान समर्पित केला. ज्ञानेश्वरी, गाथा इ. साहित्यविषयक ग्रथांना पालखीत बसवून साहित्यिक, कलावंत, रसिक वाचक आणि समस्त जनता आपले ग्रंथ प्रेम व्यक्त करीत, ही पालखी आपल्या खांद्यावारून मिरवत संमेलनस्थळी आणतात. ह्या ग्रंथदिंडीला उभ्या महाराष्ट्रातून वेगवेगळ्या वाचक लेखक मंडळांनी आणलेल्या छोट्या छोट्या दिंड्या नगरच्या बाजार समितीच्या मैदानावर येत्या जाल्या. स्वागताध्यक्ष यशवंतराव गडाख, ज्येष्ठ विचारवंत लेखक, अभितेने गिरीश कर्नाड, संमेलनाध्यक्ष व अनेक मान्यवर दिंडी




बुद्धिमत्ता चाचण्यांसाठी भेटा अथवा लिहा – प्रज्ञा मानस संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे

सोहळ्यास उपस्थित होते.

फुलांची उधळण करीत टाळ-मृदुंग, लेझीम, ढोल, रणशिंग आदी वाद्यांच्या गजरात ग्रंथ दिंडी सुमारे अडीच तास मिरविण्यात आली.

नंतर ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले. ग्रंथविक्रीचे सव्वाशे स्टॉल्स संमेलन नगरीत उभारण्यात आले. त्यात लहानग्या छकुल्यांच्या आवडीच्या विषयांपासून ते तत्त्वज्ञ शेतकरी शास्त्रज्ञ, भाषाभ्यास ह्या सगळ्यांना हव्या असणाऱ्या सुंदर सुंदर पुस्तकांचा समावेश होता. लक्षावधी पुस्तके, इथे प्रत्येकाला मोहवीत होती. विक्रमी ग्रंथ विक्री झाली. बाळगोपाळांच्या झुंडीही अधून मधून छान छान पुस्तके खरेदी करणयाच्या आनंद लुटीत होत्या.

बाळे, उत्सवमूर्ती ऐवजी उद्‌घाटकमूर्तीने बाजी मारावी तसे ह्यादेखील खेपेला घडले. ख्यातनाम नट गिरीश कर्नाड यांनी लेखन स्वातंत्र्याचा पुनरूच्चार करून त्याची पायमल्ली करणारांना कोपरखळी मारत चांगलेच सुनावले.

रात्री साडेनऊ वाजता मान्यवरांचे कविसंमेलन गाजले. आपल्या आशयघन कवितांनी ना. धों. महानोरांसह शांता शेळके, वसंत बापट, सवंत आबाजी डहाळे इत्यादी नामाकित कवींनी थंडीतही कविता ऐकण्यास बसलेल्या तीस हजार रसिकांना मंत्रमुग्ध केले.

बाळे, गेल्या ४-५ संमेलनातून एका श्रेष्ठ साहित्यिकाची जबर मुलाखत हे संमेलनाचे आकर्षण असते.

४ जानेवारीला सकाळी मुख्यमंडपात ज्येष्ठ विनोदी साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदारांची प्रकट मुलाखत ही कान तृप्त करणारी मेजवानी होती. बालचमूंसह आजोबांपर्यंत सगळ्या वयाचे रसिक खळखळून हसते ठेवत, द. मा. मिरासदारांनी सभा जिंकली. दिवसभर कार्यक्रमांचे अगदी पेव फुटले होते. कुठे साहित्य आणि राजकारण चर्चा तर कुठे ग्रेस, आरती प्रभूंच्या कविता एकमेकांना ऐकवीत होते चर्चा करणारे लेखक, वाचक गटागटाने साहित्यिक गप्पा-विनोदात रंगले होते. मुख्य मंडपात साहित्य क्षेत्रातील अनेक दिग्गज मंडळींची वेगवेगळ्या विषयावर वाद-चर्चा चालू होती. दुसरीकडे पुस्तक प्रदर्शन पाहण्यास जनांचा प्रवाहो लोटला होतात. हे पाहून गुलजार ह्यांनी 'पन्नास हजार पानांचे पुस्तक उलगडले आहे' हे म्हटले ते समर्पकच हाय. जिकडे पाहावे तिकडे माणसेच माणसे. दुपारी तीन वाजता लेखक विद्यार्थी शिक्षक मेळावा सुरू झाला.तिथे शाळकरी मुलांनी प्रचंड गर्दी केलेली. आपल्या लाडक्या लेखकांना आपले प्रश्न विचारण्यासाठी बाळ गोपाळ उत्सुक आणि प्रोत्साहित झालेले होते. शरणकुमार लिंबाळे, अरूण खोरे, फ. मु. शिंदे, आनंद यादव, ना. सं. इनामदार ही मंडळी विद्यार्थ्यांना भेटली. पुढील दिवशीही असाच एक कार्यक्रम झाला. अरूणा ढेरे, लक्ष्मीकांत तांबोळी, इंद्रजित भालेराव, ज्ञानदा नाईक, विजया संगवई, कुमार केतकर इत्यादी लेखकांच्या सान्निध्यात बाल-कुमार मेळावा रंगला. पुस्तकात भेटलेल्या लेखकांना समोर पाहून मुलांनी त्यांच्या अक्षरश: फिरक्या आणि परीक्षा घेत एक वेगळाच आनंद लुटला. इंद्रजित भालेरावांना एकाने आपली ओळख करून द्या असे फर्मावताच, 'दुष्काळामुळे परीक्षा न घेताच विद्यार्थ्यांना



आधुनिक काळात अर्थपूर्ण संस्कार होण्यासाठी ज्ञान प्रबोधिनी द्वारा प्रकाशित पोथ्या वापरा.

न घेताच विद्यार्थ्यांना उत्तीर्ण केले गेले त्यात मीही एक म्हणजेच चौथी फुकट पास! सातवीत ढकलत पास! आणि मॅट्रीकला नापास झालो' असे सांगताच बालचमूनं हाश्यहुश्यही केलं पण सर्वात उत्तम दाद ह्या लेखकाला टाळ्यांच्या कडकडाटात दिली. अरूणा ढेरे यांनी एक पक्षी व मुलाच्या मैत्रीची कथा सांगितली. गेलेले क्षण परत मिळत नाहीत. त्याची सोनेरी पिसे मनात साठवता येतात. गोष्ट ऐकून घरी परतणाऱ्या मुलांच्या डोक्याला साहित्य संमेलनाची अशीच पिसे अरूणाताईंनी अलगद लावून ठेवली. खुल्या कविमंडपात दुपारी नव्या पिढीचे कवी सामील झालेले होते. त्यात दाद घेऊन गेली ती कवी अशोक नायगावकरांची कविता,

***मराठीच्या दाटी का रे क्षणभरी***
***लाज वाटे का रे माऊलीची***
***ज्ञानदेव म्हणे पुरी कारकुनी***
***व्यापार– उदीमी उडी घ्यावी***
***ज्ञानराज स्फुंदे समाधी आतून***
***परभाषा मुळी गळा आली.***
***बऱ्या बोलाने या बोला मराठीत***
***तुकयाच्या हाती सोटा आहे.***

बाळे, खरंच का गं आपल्या मराठीची परिस्थिती इतकी नाजूक झाली आहे? हा प्रश्न बालमित्रांनी स्वत: सोडवायचा आहे. रात्री ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकरांचा 'भावसरगम' हा संगीताचा सदाबहार कार्यक्रम झाला. नगरकर रसिकांच्या पसंतीची गीते गाऊन हृदयनाथांनी नगरकरांना स्वरामृत पाजून मोहिनी तर घातली रात्री उशीरापर्यंत हा कार्यक्रम झाला.

संमेलनाच्या शेवटच्या दिवशी, मराठी चित्रपटांबद्दल एक, ऐतिहासिक कादंबऱ्या– एक परिसंवाद, ख्रिस्ती– मुस्लिम आणि संत साहित्यावर एक, आमचे जगणे आमचे लेखन, ह्यावर एक परिसंवाद असे अनेक कार्यक्रम झाले. त्यात नामवंत लेखकांनी भाग घेतला. होता. जिमखाना हॉलजवळ भरलेल्या बालमेळाव्याची रंगत काही न्यारीच होती.


आता प्रत्येकाला हुरहूर लागून राहिली होती कारण गेल्या तीन दिवसातील सर्वात शेवटचा समारोपाचा कार्यक्रम होता.

त्यामुळे मुख्य मंडपासह कुठल्याच मंडपात फारशी वर्दळ नव्हती. ग्रंथप्रेमींची गर्दी आता सवलतीत पुस्तकखरेदी करण्याच्या उद्योगासाठी ग्रंथमेळ्यात लोटली.

एका ज्येष्ठ साहित्यकारांच्या अपमान संदर्भात महाराष्ट्रातील एका नेत्याने निषेधाचा ठराव, कविवर्य गुलजार यांचे समारोपाचे भाषण ह्या दोन प्रमुख गोष्टी सोडल्यास एकूण हा सोहळा बेतास बेत झाला. संमेलन संपल्याचे सूप वाजले तरीही परस्परांच्या भेटीगाठी घेत रसिकजन पुस्तकजत्रेतून हिंडत होते.

पुढच्या वर्षीच्या साहित्य संमेलनाला हजर राहण्याचे एकमेकांना कबूल करीत भरल्या मनानं जो तो एकमेकांचा निरोप घेत होता आणि मनात ७० व्या साहित्य संमेलनाच्या कडू गोड स्मृतींना उजाळीत होता.

**






रु. २५०/–देणगी देऊन वाढदिवसानिमित्त आपल्या नावाने छात्र प्रबोधनमधील एक पान प्रायोजित करा.

# शुद्ध शब्दच वापरावेत!

नेहमीच्या वापरातील काही शब्द आपण अशुद्ध लिहितो. अशा काही शब्दांची यादी दिलेली आहे. ज्यात चूक होण्याचा संभव असतो असे शब्द तुम्हीही शोधून काढा. जाणीवपूर्वक असा प्रयत्न केला तर शुद्धलेखन नकळत सुधारेल!

| अशुद्ध शब्द | शुद्ध शब्द |
|---|---|
| १. पारंपारिक | पारंपरिक |
| २. अद्यावत् | अद्ययावत् |
| ३. शारिरीक | शारीरिक |
| ४. उपहारगृह | उपाहारगृह |
| ५. अनुसूया | अनसूया |
| ६. आशिर्वाद | आशीर्वाद |
| ७. पितांबर | पीतांबर |
| ८. अभिष्टचिंतन | अभीष्टचिंतन |
| ९. हिरक | हीरक |
| १०. रविंद्र | रवींद्र |

# प्रहेलिका

१. **तातेन कथितं, ''पुत्र, पत्रं लिख मम आज्ञया'।**
**न तेन लिखितं पत्रं, पितुः आज्ञा न लङ्घिता।।**

पित्याने म्हटले, ''पुत्रा, माझ्या आज्ञेनुसार पत्र लिही.'' त्याने पत्र लिहिले नाही, व पित्याच्या आज्ञेचे उल्लंघनही केले नाही.

(यातील 'न तेन' हे शब्द जोडले की कोडे सुटते. 'नतेन' याचा अर्थ नम्रपणे, त्याने नम्रतेने पत्र लिहिले आणि पित्याच्या आज्ञेचे उल्लंघन केले नाही.)

२. ब्राह्मणस्य महापापं संध्यावन्दकर्मभिः।
अन्न क्रियापदं गुप्तं यो जानाति स पण्डितः।।

संध्यावंदन करणे हे ब्राह्मणाचे महापाप आहे. (दुसऱ्या ओळीत म्हटले आहे की) इथे लपलेले क्रियापद जो ओळखील तो हुशार होय. (अस्य म्हणजे टाक. म्हणून 'ब्राह्मण अस्य' असे केल्यास हे ब्राह्मणा, तू संध्यावंदन करून महापाप टाळ वा यातून मुक्त हो. असा योग्य अर्थ मिळतो.)

**



विविध रोगांवर गुणकारी 'प्रबोधन सूक्ष्मौषधे' वापरा. संपर्क 'आयुर्वेद संशोधिका', ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

# नैसर्गिक कीटक नाशके

– ओंकार वैद्य

एक दिवस बंगलोरजवळच्या एका शेतकऱ्याच्याबद्दल एक लेख वाचला. त्याची थोडक्यात हकीकत अशी– श्री. रेड्डी हे गेली अनेक वर्षे पिढीजात शेती करत आहेत. गेली काही वर्षे रासायनिक खतांचा वापर करत गेल्यामुळे सुरवातीला उत्पन्न मिळाले पण काही वर्षांनी जमीन क्षारयुक्त होत होत नापीक बनत चालली. श्री. रेड्डी इतके तोट्यात गेले की आत्महत्येपर्यंत विचार बळावले. पण त्याच वेळेस नैसर्गिक शेतीबद्दल वाचून त्याप्रमाणे काही वर्षे प्रयोग करून गेल्या वर्षी त्यांनी विक्रमी उत्पन्न काढले. अगदी कीटकनाशके सुद्धा गोमूत्र, तंबाखूचे पाणी इ. चाच वापर केला.

दुसरी एक गोष्ट पुस्तकातच वाचली होती की, डी. डी. टी. चा परिणाम डासांवर असा झाला की त्यालाही प्रतिकारशक्ती त्यांच्यात निर्माण झाली आणि डी. डी. टी. ला डास दाद देईनासे झाले आणि डी. डी. टी. चा दुष्परिणाम असा की तिचे विघटन होऊ शकत नाही. ती जशीच्या तशी अन्नसाखळीत टिकून राहते आणि त्याचे दुष्परिणाम मात्र दूरगामी होत राहतात.

अनेक रासायनिक कीटकनाशकांबाबत असेच घडताना दिसते आहे. पालेभाज्या, फळे कितीही धुतली तरी काही कीटकनाशके तशीच टिकून राहातात. (उदा. द्राक्षावर मारलेला कीटकनाशाचा पांढरा थर द्राक्षे धुतली तरी तसाच राहतो. ही द्राक्षेखाल्यावर घसा दुखणे, मळमळणे इ. लक्षणे दिसतात. नैसर्गिक शेतीचा विचार करत असताना गांडूळ शेतीचा विचार करीत होतो. गांडूळ शेती, नैसर्गिक शेती (organic farming) मध्ये काम करत असताना या प्रश्नावर आम्ही विचार करत होतो आणि नारायण रेड्डींच्या बातमीने आमचे लक्ष वेधून घेतले. आम्हीही हा प्रयोग टोमॅटोच्या किडीवर करून बघायाचा ठरवला. वेगवेगळ्या संहतीचे गोमूत्र एकआड एक दिवस फवारले तेव्हा अक्षरश: १५ दिवसात कीड तर नष्ट झालीच पण झाडे जास्त टवटवीत, तजेलदार दिसायला लागली.

तुम्हालाही घरच्या घरी अशी कीटकनाशके बनविता येऊ शकतील आणि डास, मुंग्या, चिलटे, झुरळे यांच्यापासून घराचे रक्षण करता येऊ शकेल.

कडुलिंब, धोतरा लसूण, आलं, हळद, एरंडेल तेल यांच्यासारखी कडू, विषारी, उग्र दर्प असणारी झाडे किंवा त्यांची फळे, पाने निवडा आणि त्याच्यापासून खालीलपैकी कोणत्याही एक पद्धतीने त्याचे अर्क काढून कीटकनाशक तयार करा.

१) झाडाच्या ज्या भागापासून (पाने, फुले, फळे, बिया, फांद्या) कीटकनाशक बनवायचे आहे त्या भागाचे बारीक तुकडे करा. त्याचा अर्क पाण्यामध्ये उतरेपर्यंत उकळा. ते मिश्रण गाळा. उरलेला चोथा वाळवून जाळला असता त्याचाही

उपयोग कीटकांना दूर ठेवण्यासाठी होईल. त्याचा उपयोग झुरळासाठी होतो का तेही बघावे.

२)पाण्याऐवजी अल्कोहोलमध्येही अर्क काढता येईल. पाण्यातील अर्कापेक्षा अल्कोहोलमधील मिश्रण परिणामकारक ठरते.

***अल्कोहोल अर्क उकळताना घ्यावयाची काळजी*** १) प्रत्यक्ष अल्कोहोल बर्नरवर/शेगडीवर न ठेवता पाण्यात अल्कोहोलचे भांडे ठेऊन अल्कोहोलमध्ये पाने, फुले इ. उकळावे. २) अल्कोहोलअर्क असलेली बाटली घट्ट बंद करून ठेवावी.

३) झाडाची पाने प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या पाण्यातील मिश्रणामध्ये ठेवा. नंतर ते मिश्रण एका ट्रेमध्ये पसरून ठेवा आणि वाळवा. पूर्ण वाळत आल्यानंतर त्याच्या वड्या पाडा आणि या पूर्ण वाळलेल्या वड्यांचा उपयोग मशीनवर ठेवून (Good Knight च्या वड्यांसाठीचे मशीन) कृत्रीमरित्या कीटक निवारणासाठी करता येईल. अर्क काढताना एक झाड अथवा दोन, तीन झाडे अशी वेगवेगळी मिश्रणे (Combinations) करून बघा आणि तुमचे निष्कर्ष आम्हाला कळवा.

असाच एक प्रयोग तुम्हाला पांढरा कांदा आणि लाल कांदा याबाबतीत करून बघता येईल. कोणत्या कांद्याच्या सान्निध्यात बुरशी लागत नाही ते आम्हाला कळवा.

नद्यांवर वाढणारी जलपर्णी आणि त्यामुळे वाढणारे डासांचे प्रमाण यावर उपाय म्हणऊन पुण्यातील एक संशोधिकेने हळद, मीठ यांच्या मिश्रणातून अत्यंत कमी किंमतीत एक मिश्रण तयार केले होते की ज्यायोगे जलपर्णीचा पर्यायाने डासांचा नायनाट होईल. बघू तुम्ही कोणते नवीन नैसर्गिक कीटकनाशक शोधून काढता आहात!

**लागणार ना मग कामाला?**

बोरीक पावडरच्या ऐवजी घरच्या घरी धान्यसंरक्षक कीटकनाशक तयार करा. श्री. फेनमन या नोबेल पारितोषिक विजेत्या भौतिकशास्त्रज्ञाने आपल्या You must be joking Mr. Fennumann या पुस्तकात म्हटले आहे की, 'माझ्यातला शास्त्रज्ञ लोकांना एका गमतीदार घटनेमुळे जाणवला. लहानपणी मी मुंग्यांची रांग बघितली की एक मुंगी उचलून पलीकडे ठेवत असे. रांगेत काय फरक पडतो हे बघत असे किंवा एकाच्या ऐवजी दोन मुंग्या उचलल्या किंवा पेपर त्या रांगेखाली सरकवून अख्खा रांगेचाच मार्ग वळवला किंवा ज्या जामच्या बाटलीकडे त्या मुंग्या जात आहेत ती जामची बाटली उचलून वेगवेगळ्या ठिकाणी ठेवली तर त्या मुंग्यांच्या रांगेवर काय परिणाम होतो असे निरीक्षण मी करीत असे.'

शेवटी Trial & Error पद्धतीनेच न थकता प्रयोग केले तरच अभिनव शोध लागतात. मग लागणार ना प्रयोगाला? तुमच्यातही कदाचित एखादा उद्याचा नोबेल पारितोषिक विजेता शास्त्रज्ञ दडला असेल.

**

---

**ओंकार वैद्य**
इ. १० वी, ज्ञानप्रबोधिनी

# मागोवा ९६

*– विक्रम वाळिंबे*

प्रिय प्रबोधक,

नुकतंच ९६ साल संपलं. वर्षभरातल्या सुट्ट्या–सहली–शिबिर, अभ्यास, परीक्षा, मित्रमंडळी, ह्यांच्या आठवणी तुझ्या मनात अजून ताज्या असतील. ह्या वर्षात काय काय पाहिलंस? ऐकलंस? अनुभवलंस? असं जर मी तुला विचारलं तर ह्यातलेच काही आठवणींचे पक्षी पकडून आणून तू मला दाखवशील. ते खरंच खूप सुंदर असतात... कायम जपून ठेवावेत असे... पण जागरूकपणे जगणाऱ्यानं फक्त तेवढंच लक्षात ठेवून भागत नाही. तुझ्या एकट्याच्याच नव्हे तर तुझ्या संपूर्ण गावाच्या, जिल्हयाच्या, राज्याच्या आणि आपल्या संपूर्ण देशाच्याच जीवनात गेल्या वर्षभरात कायकाय घडलं हेही तुला आठवून बघावं लागेल.

चहूदिशा हजारो मैल पसरलेला, निसर्गवैविध्यानं नटलेला, नाना वंश–भाषा–चालीरीतींचा, कोट्यवधी लोकसंख्येचा आपला खंडप्राय देश! वर्षभरातली त्याची वाटचाल, प्रगती–अधोगती पाहायची म्हणजे राजकारण, अर्थकारण, समाजजीवन, सांस्कृतिक क्षेत्र, क्रीडा विश्व, अत्याधुनिक विज्ञान–तंत्रज्ञान... अशा कितीतरी क्षेत्रातल्या त्याच्या कामगिरीचा नीट विचार करावा लागतो. आठवायला लागलं की लक्षात येतं की ह्या सर्वच क्षेत्रामध्ये ह्यावर्षी अशा काही घटना घडल्या आहेत की एक मोठं घडामोडीचं, स्थित्यंतरांचं, महत्त्वाचं वर्ष म्हणून हे वर्ष कायम लक्षात ठेवलं जाणार आहे.

साहजिकच पहिल्यांदा लक्ष जातं




राजकारणाकडे. आणि राजकारण म्हटलं की पहिल्यांदा आठवतात ते या वर्षात उघडकीला आलेले कित्येक बड्या राजकीय नेत्यांनी केलेले आर्थिक गैरव्यवहार–घोटाळे.

वर्षाच्या सुरवातीलाच 'हवाला' घोटाळ्यावर खूप चर्चा, वाद–वादंग झाले. यामध्ये कित्येक राजकीय नेते काही एजंटांकरवी परदेशातून मोठ्या प्रमाणावर काळा पैसा आणून तो निवडणुकांमधील गैरप्रकार – गुंडगिरीसाठी वापरत असल्याचं उघड झालं. जवळजवळ सर्वच पक्षांचे नेते

थोड्याफार प्रमाणात ह्यात गुंतलेले असल्यामुळे त्यांची खोटी प्रतिष्ठा पार धुळीला मिळाली.

त्यापाठोपाठ बिहारमध्ये पशुखाद्याच्या खरेदीत झालेल्या गैरव्यवहारात हात असलेले लालूप्रसाद यादव, दूरसंचार विभागाची कंत्राटे खाजगी कंपन्यांना देताना झालेल्या गैरव्यवहारात हात असलेले त्या खात्याचे माजी राज्यमंत्री सुखराम, शासकीय गृहनिर्माण योजनेतील घरे आणि दुकाने आपल्याच नातेवाईकांना आणि हितसंबंधी यांना मिळवून देणाऱ्या राज्यपाला शीला कौल, तसंच आपल्याच मित्रमंडळींना आणि नातेवाईकांना पेट्रोलपंपसाठी परवाने आणि गॅस एजन्सीज् मिळवून देणारे त्या खात्याचे माजी राज्यमंत्री कॅ. सतीश शर्मा, अब्जावधी रूपयांची बेहिशेबी संपत्ती जमवणाऱ्या तामिळनाडूच्या मुख्यमंत्री जयललिता, राजकीय वर्तुळातील वजनाचा फायदा घेऊन, परकीय चलनविषयक कायद्याचे उल्लंघन करणारे, अमाप पैसा जमवणारे चंद्रास्वामी, आणि ह्या सर्वांवर कळस म्हणजे लखुभाई पाठक, झारखंड मुक्ती मोर्चा इ. संबंधात लाचप्रकरणात अडकलेले, माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग ह्याची बदनामी व्हावी ह्या हेतूने त्यांच्या नावे अमेरिकेजवळील सेंट कीटस बेटांवरील बँकेत एक बनावट खाते उघडण्याच्या कारस्थानात हात असलेले भारताचे माजी पंतप्रधान नरसिंह राव... अशा कित्येक बड्याबड्या धेंडांचं पितळ उघंड पडलं.

ह्यातल्या कित्येक प्रकरणी बड्याबड्या नेत्यांच्या चौकशा गुप्तहेर विभागाकडून चालू झाल्या. कित्येकांवर खटले सुरू झाले. काहींना अटक झाली. देशाच्या माजी पंतप्रधांनाही अटक आणि न्यायालयीन चौकशीला तोंड द्यावं लागल्याचा अभूतपूर्व प्रसंग ह्याचवर्षी घडला. ह्या सर्व काळामध्ये न्यायालयांनी केलेल्या चौकशीची आणि दिलेल्या निकालांची कुणी स्तुती केली तर कुणी




न्यायालयांची वाढती सक्रियता लोकशाहीला मारक असल्याचं मत व्यक्त केलं. तुझ्यामाझ्यासारखा सामान्य माणूस मात्र भ्रष्ट सत्ताधारांना कुठेतरी अंकुश लावला जात असल्यानं जाम खूष झाला.

दुसरी महत्त्वाची घटना होती ती म्हणजे यंदा झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका, स्थिरतेच्या नावाखाली चाललेल्या भ्रष्ट काराभाराला कंटाळून मतदारांनी काँग्रेसची हकालपट्टी केली खरी पण कुणालाच बहुमत न मिळाल्यामुळे भारतामध्ये त्रिशंकु लोकसभा अस्तित्वात



इ. १०वी अभ्यास मार्गदर्शन पुस्तिका किंमत रू. १०/- छात्र प्रबोधन प्रकाशन.

आली. सर्वाधिक जागा मिळवणाऱ्या भाजपाचं सरकार इतरांकडून पुरसं समर्थन न मिळाल्यामुळे केवळ तेरा दिवस तग धरू शकलं.

आजवरचं हे सर्वात अल्पायुषी केंद्र सरकार! त्यानंतर तेरा वेगवेगळ्या पक्षांनी एकत्र येऊन संयुक्त आघाडी बनवली. काँग्रेसनं ह्या आघाडीला पाठिंबा दिला आणि हे संयुक्त आघाडीचं सरकार स्थापन झालं. आपापसातल्या विरोधांना-मतभेदांना बाजूला ठेवून काँग्रेसची मर्जी राखत राखत हे सरकार आजपर्यंत तरी तग धरून आहे.

देशाच्या दृष्टीनं खरी अभिमानास्पद घटना ठरली ती म्हणजे काश्मीरात झालेली



विधानसभेची निवडणूक आणि सप्टेंबरमध्ये तिथं सत्तेवर आलेलं फारूख अब्दुल्लांचं नॅशनल कॉन्फरन्सचं सरकार. दहशतवाद्यांच्या धमक्यांना धुडकावून लावून मोठ्या प्रमाणाावर काश्मीरी जनतेनं मतदानात भाग घेतला ही एकच गोष्ट पाकिस्तानाच्या प्रचाराला ती कंटाळली आहे आणि लोकशाही मार्गाने भारतात राहूनच ती आपले हक्क मिळवू इच्छिते; खोट्या धर्मप्रचाराला बळी न पडता आपला खरा विकास साधू इच्छिते हे दाखवून गेली.

काश्मीर प्रश्न ह्यामुळे सौम्य होत असतानाच यंदा झारखंड, उत्तराखंड, गोरखालँड, विदर्भ अशा लहान राज्यांच्या मागणीनं पुन्हा एकदा डोकं वर काढलं. ह्यामागे राजकीय स्वार्थ आहेत हे लक्षात घेतलं तरी काश्मीरचाही आणि ह्या भागांचाही पुरेसा विकास गेल्या पन्नास वर्षात झालेला नसल्यामुळेच तिथल्या जनतेच्या मनात आपल्याला फसवलं गेलं आहे. आपलं शोषण झालं आहे ही भावना निर्माण झाली आहे; हे लक्षात घ्यायला हवं आणि स्थानिक जनतेला न्याय देणारी आर्थिक विकासाची धोरणं ह्या भागांमध्ये राबवायला हवीत.

भारत आणि बांगलादेश ह्यांच्या दरम्यान गंगेच्या पाणीवाटपाचा प्रश्न वाटाघाटीनं यंदा सोडवण्यात आला. यामुढे ३० वर्ष जानेवारी ते मे ह्या पाच महिन्यात बांगलादेशात गंगेचं अधिक पाणी देण्याचं मान्य करून आपण पाणी-तंटा तर सोडवलाच पण उभय देशांमधले संबंध बांगलादेशाच्या स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षात अधिक मैत्रीपूर्ण बनवले. पाकिस्तानपासून त्यांना स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्ये आपला सिंहाचा वाटा होता या गोष्टीची आठवण यानिमित्तानं जागवली गेली.

तत्पूर्वी नोव्हेंबरमध्ये चीनचे अध्यक्ष झियांग झेमिन ह्यांची भारतभेट शांतिपूर्ण सहअस्तित्वाचा करार उभय देशांमध्ये होण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली. भारताला भेट देणारे हे चीनचे पहिलेच अध्यक्ष.

एकमेकांविषयी शत्रुत्व बाळगण्यापेक्षा आणि त्यासाठी लष्करावर अधिकाधिक लक्ष आणि खर्च केंद्रित करण्यापेक्षा आपापल्या आर्थिक विकासावर उभयदेशांनी अधिक लक्ष एकवटावं आणि यामध्ये एकमेकांना मदत करावी असं मत मांडलं गेलं.

शेजारी राष्ट्रांबरोबर असे संबंध सुधारण्याचे प्रयत्न करत असतानाच जागतिक पातळीवर भारताला काहीशी ताठर, ठाम भूमिका घ्यावी लागली. अण्वस्त्र चाचणी बंदीच्या सध्याच्या मसुद्याला भारताने संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीत ठाम विरोध केला तथापि तो नामंजूर केला गेला. सध्याच्या मसुद्यामुळे सध्या आण्विक क्षमता बाळगणाऱ्या पाच बलाढ्य राष्ट्रांमध्ये आणि इतर राष्ट्रांमध्ये भेदभाव केला जात असल्यामुळे सर्वांना समान स्तरावर आणणाऱ्या सर्वार्थाने संपूर्ण अण्वस्त्रबंदीची मागणी भारतानं केली आणि तोपर्यंत बड्या राष्ट्रांच्या दबावाला बळी न पडण्याचं ठरवलं. परिणामत: यंदा संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा समितीमध्ये जागा मिळविण्यासाठीच्या निवडणुकीत आपल्याला अपयश आलं. आणखीही नुकसानकारक परिणामांना कदाचित तोंड द्यावं लागेल. पण बड्यांची हुजरेगिरी करण्यापेक्षा स्वत:च्या मूल्यांशी ठाम राहाणं अभिमानास्पदच म्हटलं पाहिजे.

आंतरराष्ट्रीय राजकारणात आपली पत वाढत असतानाच देशांतर्गत मुरलेला भ्रष्टाचाराचा, सत्तांधतेचा रोग समूळ नाहीसा करण्यासाठी आण्णा हजारेंनी सुरू केलेलं आंदोलन हे यंदाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणावं लागेल. जनशक्तीच्या आविष्कार फक्त भ्रष्ट सत्ताधाऱ्यांना घालवण्यापुरता, मतपेटीपुरताच राहिला तर फक्त जुन्या जळवा जाउन नवीन जळवा येतात हे स्पष्ट झालेलं आहे. सत्ताधाऱ्यांवर कायमस्वरूपी अंकुश ठेवणारी काही यंत्रणा अशा आंदोलनांमधून उभी राहिलीतर ते अधिक विधायक होईल.

राजकारणाचे परिणाम इतर अनेक क्षेत्रांवर पडतात. आर्थिक क्षेत्रावर तर राजकीय निर्णय, धोरणं ह्यांचा बराच प्रभाव असतो. गेल्या वर्षभरातल्या स्थितीकडे पाहिलं की, राजकारणातल्या अस्थिरतेचं, घडामोडीचं सावट अर्थकारणावरही पडल्याचं लक्षात येईल. या आधीच्या केंद्रसरकारनं परकीय उद्योगधंद्यांना, परकीय मालाला आपल्या देशात खुलेपणानं येऊ देण्याचं, त्यांच्यावर कोणतेही निर्बंध न घालण्याचं उदार आर्थिक धोरण स्वीकारलं होतं. आघाडी सरकारनेही तेच धोरण पुढे चालू ठेवत असल्याचं जाहीर केलं असलं तरी त्यासाठी आवश्यक त्या





काळासंगे धावण्यासाठी धरावी विज्ञानाची कास, सभासद होऊन 'प्रबोधन' चे मिळतो हा विश्वास!

सुधारणा, सरकारी नियमांमधील दुरूस्त्या, बँकांच्या कारभाराबाबतच्या काही सुधारणा याबाबत कोणतीच विशेष पावलं उचलताना दिसत नाही त्यामुळे काहीसं गोंधळाचं वातावरण निर्माण झालं आहे.

उद्योगधंदे – त्यांना लागणारे भांडवल एकतर शेअर्सच्या विक्रीतून किंवा कर्ज काढून मिळवतात. यंदा वर्षाच्या सुरूवातीपासूनच शेअर्सची खरेदी–विक्री मंदावल्यामुळे आणि बँकांकडून कर्जपुरवठाही मुबलक प्रमाणावर आणि स्वस्त व्याजदराने होत नसल्याने भारतातल्या उद्योगांना भांडवलाची चणचण भासत आहे. परिणामी नवनवीन उद्योगांची उभारणी आणि त्याद्वारे अधिकाधिक लोकांना रोजगार उपलब्ध होण्याची प्रक्रिया मंदावली आहे.

सगळीकडे सारखाच न पडल्यामुळे, वादळं पूर ह्यांमुळे आणि अन्य काही कारणांमुळे शेतीचंही उत्पन्न यंदा फारसं चांगलं नसेल अशी शक्यता आहे. तरीही यंदाच्या वर्षी आणि येत्या पंचवार्षिक योजनेमध्ये प्रतिवर्षी सात टक्के इतकी उत्पन्न वाढ आपल्या देशात होईल असं सरकारचं आणि नियोजन मंडळाचं म्हणणं आहे.

ह्या आर्थिक घडामोडींपेक्षा आपल्या समाजात आजुबाजूला घडणाऱ्या दुसऱ्या काही गोष्टींचा तुझ्या मनावर जास्त प्रभाव पडला असेल. पाश्चात्त्य पॉप संगीतात जगप्रसिद्ध मायकेल जॅक्सनचा मुंबईमध्ये झालेला कार्यक्रम, बंगलोरमध्ये झालेली जागतिक सुंदरी स्पर्धा, चित्रकार एम. एफ. हुसेननी काढलेल्या सरस्वतीच्या चित्रावरून



उत्पादित मालालाही बाजारात फारसा उठाव नाही परंतु उत्पादन मात्र पूर्वीच्याच वेगाने चालू आहे. त्यामुळे उद्योजकांजवळ तयार मालाचे प्रचंड साठे पडून आहेत. अशीच अवस्था राहलि तर संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेवर वाईट परिणाम होऊ शकतो. सरकारचीही अवस्था बिकट आहे. कर संकलन कमीतकमी होत असताना अधिकाधिक अनुदान, सवलती यामुळे सरकारची आर्थिक तूट वाढत आहे. पाऊस पुरेसा पडल्याचं चित्र असलं तरी तो

झालेला वाद ह्यासंबंधी बरीच खळबळ, प्रक्षोप समाजामध्ये निर्माण झाला. कदाचित तुझ्या मित्रमंडळीतही ह्याविषयावर गप्पा, चर्चा झाल्या असतील. अशा चर्चा जरूर करत जा. त्यातून खरं श्रेष्ठ काय आहे आणि हिणकस, उथळ काय आहे हे तुझं तुलाच समजत जाईल.

क्रीडाक्षेत्र तर तुझ्या खास आवडीचं क्षेत्र. यंदा ॲटलांटात ऑलिम्पिक स्पर्धा झाल्या. लिअँडर पेसनं टेनिसमध्ये कांस्यपदक मिळवून खरंच दैदिप्यमान कामगिरी केली पण बाकी



कल्पनाशक्ती वाढविण्यासाठी 'कल्पक बनू या' अवश्य वाचा ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन

सर्वच खेळांमध्ये आपल्या पदरी निराशाच आली. अगदी हॉकीतसुद्धा ज्यामध्ये आपण एकेकाळी जगज्जेते होतो, अशा खेळातही आपण आठव्या क्रमांकावर फेकले गेलो, ही आपल्या दृष्टीने दुर्दैवी घटना. यंदाची विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धाही आपण उपांत्य फेरीपर्यंतच धडक मारू शकलो, पण नंतर भारत-ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका अशा तिरंगी एक दिवसीय क्रिकेट स्पर्धेत मायदेशातच आपण टायटन चषक पटकावला. द. आफ्रिकेविरूद्ध कसोटी क्रिकेट मालिकाही जिंकली म्हणजे वर्ष तसं संमिश्र यशाचं गेलं.

जागतिक बुद्धिबळ क्षेत्रात विश्वनाथन आनंदची विजयी घौडदौड, जलद बुद्धिबळ स्पर्धेत कास्पारोव्हला हरवून त्यानं मिळवलेलं अजिंक्यपद, त्याच्यापाठोपाठ पी. हरिकृष्णने दहा वर्षाखालील मुलांमध्ये बुद्धिबळात मिळवलेलं विश्वविजेतेपद, पंधरा वर्षाखालील मुलांच्या विश्वकरंडक स्पर्धेत भारताच्या कुमारांनी मिळवलेलं अजिंक्यपद, अपर्णा पोपटने जागतिक बॅडबिंटनमध्ये मिळविलेलं उपविजेतेपद अशा उत्साही वाढवणाऱ्याही घटना घडल्या.

आपल्या खेळाडूंची आनुवंशिक आणि अंगभूत गुणवत्ता ओळखून लहानपणापासून विशिष्ट खेळांमध्ये त्यांना मार्गदर्शन,आधुनिक साधने, सराव दिला गेला, विशेष प्रयत्न केले तर पदकांची लयलूट करण्याचं सामर्थ्य भारताच्या खेळांडूमध्येही नक्कीच आहे.

साहित्य क्षेत्रातला देशातला सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार गेल्यावर्षी एम.टी वासुदेवन् नायर ह्या मल्याळी साहित्य श्रेष्ठाला मिळाला. यंदाचा पुरस्कार नुकताच बंगाली लेखिका,पत्रकार शिक्षिका आणि सामाजिक कार्यकर्त्या असणाऱ्या महाश्वेतादेवी यांना जाहीर झाला आहे. याच वर्षी टी. एन्. शेषन आणि पांडुरंगशास्त्री आठवले यांना रेमन मॅगेसेसे पुरस्कार मिळाला. निवृत्तीनंतर शेषन आता विधायक समाज कार्यासाठी आयुष्य वेचणार असल्याचं दिसतं. विकास साधण्याचं काम अनेक राज्यात पसरत आहे. आपल्या समाजाचं देशाचं खरं वैभव हे लोक आणि त्यांचं असं कार्य आणि जीवन हे आहे. स्वातंत्र्यलढ्यातील सौदामिनी अरूणा असफअली भारताचे सहावे राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी, समाजसेविका गोदुताई परूळेकर ह्यांच्या निधनानं असं अमोल धन हरवलं. महाराष्ट्रामध्ये विद्याधर गोखल, दया पवार, माणिक वर्मा ह्यांचे मृत्यू चटका लावणारे ठरले.

देशामध्ये स्त्रियांच्या अवस्थेवर प्रकाश टाकणाऱ्या काही घटना यंदा घडल्या. श्रीमती बजाज ह्या भारतीय प्रशासकीय सेवेतील उच्चपदस्थ अधिकारी त्यांच्याशी अशिष्ट वर्तन केल्याबद्दल पोलिस महासंचालक के. पी. एस. गील यांना अखेर उच्च नयायालया सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. गिल आता सर्वोच्च न्यायालयात गेले आहेत. १९८७ साली राजस्थानात झालेल्या रूपकुंवर सती प्रकरणातले सर्व आरोपी पुराव्याअभावी यंदा निर्दोष सुटले. राजस्थानातल्या भंवरीदेवीला अजून तिच्यावर झालेल्या जुलुम अत्याचाराबाबत न्याय मिळायचाय पण तरीही ती आणि देशभराच्या तिच्यासारख्या 'मिळून साऱ्यजणी' आपला आवाज, आपला आत्मसन्मान बुलंद बनवताहेत. प्रशासन आणि नगरपालिकांनंतर

लोकसभेतही स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवण्यसाठी विधेयक येत आहे.

यावर्षीच्या काही दुर्घटना चटका लावून गेल्या अमरनाथ यात्रेमध्ये थंडी, पाऊस आणि नाकाम प्रशासनानं केलेली दिरंगाई यामुळे दोनशे लोक ठार झाले. आंध्रात आलेल्या चक्रीवादळात एक हजारावर लोक मृत्युमुखी पडले. गुरं, शेती, घरं असं सगळं मिळून २००० कोटी रू. च्या वर आर्थिक नुकसान झालं. ओरिसात दुष्काळाने शेकडो भूकबळी पडले. दिल्लीजवळ हरियाणामध्ये चरखी दादरी इथं हवेत दोन विमानांची टक्कर होऊन ३५१ प्रवासी व कर्मचारी ठार झाले. ३० डिसेंबरला आसाममध्ये रेल्वेत बॉम्बस्फोट होऊन जवळजवळ ३०० लोक ठार झाले. दिल्लीमध्ये डेंग्यू तापाच्या भयानक साथीत ३०० हून अधिक लोक मृत्युमुखी पडले.... ह्या सगळ्या गोष्टी काय दर्शवितात? वादळासारख्या नैसर्गिक आपत्तीसमोर काहीच इलाज नसला तरी इतर सर्व गोष्टी आधुनिक तंत्रज्ञान, शिक्षण आणि कर्तव्यदक्ष प्रशासनाच्या साहाय्यानं टाळता येऊ शकतात.

आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानातील शोधांकडे पाहताना तुझी माझी मान अभिमानानं उंच व्हावी अस बरच काही घडलं. सात फेब्रुवारीला इन्सॅट 2-C उपग्रह प्रक्षेपित करण्यात आला. २१ मार्चला ध्रुवीय उपग्रह अंतराळात वाहून नेणाऱ्या PSLV-D3 ह्या प्रक्षेपकाचं श्रीहरिकोट्याहून यशस्वी प्रक्षेपण करण्यात आलं. ही क्षमता असलेल्या पाच बड्या राष्ट्रांच्या रांगेत भारत आता जाऊन बसला. ह्या प्रक्षेपकानं IRS-1C हा दूरसंवेदन उपग्रह अवकाशात नेऊन ठेवला आहे. याआधी परदेशी साहाय्याने सोडलेल्या IRS-1C ने जानेवारी ९६ पासून कामाला सुरूवात केली. प्रक्षेपण तंत्रज्ञानात अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या क्रायोजेनिक इंजिनाच्या निर्मितीत यंदा नुकतीच आपण स्वयंपूर्णता मिळवली. हे यंदाचं आणखी एक अभिमानास्पद विशेष. दोन वर्षापूर्वी हे तत्रंज्ञान आपल्याला देण्यास अमेरिकेने रशियाला मज्जाव केला होता. आपल्या शास्त्रज्ञांनी स्वतःच्या शास्त्रज्ञांनी स्वतःच्या प्रयत्नांनी ते स्वतःच विकसित केलं ही गोष्टच आपण किती झेप घेऊ शकतो हे दाखवून देणारी आहे. संरक्षणक्षेत्रातही देशी बनावटीच्या अर्जुन रणगाड्याचा समावेश लष्करात झाल्यामुळे आणि २५० कि. मी. पल्ल्याच्या पृथ्वी ह्या लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी आपण घेतल्यामुळे आपलं बळ अधिक वाढलं. हळुहळू भारत आशियातली एक महासत्ता बनण्याच्या दिशेनं वाटचाल करतो आहे.

ह्या वर्षभरातील घटना, माहिती थोडक्यात तुला सांगण्याचा मी प्रयत्न केला. तझ्या मोठेपणी ह्यापैकीच एखाद्या किंवा अनेक क्षेत्रातली आह्वानं तुझ्यापुढे असतील.ती पेलण्याचं बळ आत्तापासूनच तुझ्या पंखांमध्ये निर्माण व्हावं त्यासाठी तू प्रयत्न करायला लागावंस आणि तुझ्या भरारीला क्षितीज हीच मर्यादा असावी ही नववर्षानिमित्त तुला शुभेच्छा.

तुझा
विक्रमदादा

**



'प्रज्ञाबोध मालिका' रु.१००/-(NTS परिक्षेसाठी शालेय प्रवणता कसोटी प्रश्नसंच, इंग्रजी व मराठी माध्यमांमध्ये) छात्र प्रबोधन प्रकाशन

# शब्दकोडे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | ४ | | | | ■ |
| | ■ | ५ | | | | ■ | ■ | ■ | ६ |
| ७ | | | ■ | | ■ | ८ | ९ | १० | |
| | ■ | ११ | १२ | ■ | १३ | | | | ■ |
| ■ | १४ | ■ | १५ | | | ■ | १६ | | १७ |
| १८ | | | | ■ | ■ | १९ | ■ | | |
| २१ | | ■ | २२ | | २३ | | २४ | ■ | |
| | ■ | २५ | | ■ | | ■ | २६ | २७ | |
| २८ | | | ■ | २९ | | | ■ | ३० | |

**आडवे शब्द**

१. लक्ष्मी ३. ताऱ्यांचे पुंजके मिळून दिसणारा नदीच्या आकाराचा प्रवाह. ५. जोराची थप्पड. ७. अपरिचित. ८. रानटी, क्रूर. ११. -- गोड लागला म्हणून काय मूळापासून खावा? १३. 'याच्या' शिवाय नमस्कार नाही. १५. तारण १६. प्राण्यांची चघळण्याची क्रिया १८. कृष्णाचे एक नाव. २०. घोड्याचे तळपाय. २१. -- संवाद २२. संकुचित मनोवृत्तीचा माणूस. २५. धान्य वगैरे पाखडण्यासाठी 'हे' वापरतात. २६. तुकडा (शक्यतो लाकडाचा) २८. भानगड २९. पावसाळी हवा. ३०. वडील.

**उभे शब्द**

१. गोष्ट २. पैसे खाणारा ३. पूजनीय ४. वायस. ६. आकार. ८ एकवचनी, एकबाणी आजानुबाहू. ९. मान-मरातब १०. 'पाट्याचा' सोबती. १२. काशीतील प्रसिद्ध विहीर. १३. बांधा १४. आनंद १७. डोक्यावर भरपूर तेल लावण्याच्या क्रियेपासून बनलेला शब्द १८. जंगलाला लागलेली आग. १९. बायकोच्या बहिणीचा नवरा. २३. एका ग्रहाचे नाव २४. भाताला उकळी येण्याची क्रिया २५. बदला २७. वेल

**संदीप शेषराव चव्हाण**
परभणी

---

गेल्या अंकापासून नियमितपणे आपल्याला आवडणारी कोडी अंकात समाविष्ट करण्याचा आम्ही संकल्प केलेला आहे. तरी वेगवेगळ्या प्रकारची, नावीन्यपूर्ण मजेदार कोडी जरूर पाठवावीत. निवडक कोड्यांना अंकामध्ये प्रसिद्धी दिली जाईल.



ललित लेखनाची कृतिपुस्तिका 'प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास' आवर्जून संग्रही ठेवा ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन

# हरिश्चंद्रगड साहस-सहल, २१ ते २४ डिसेंबर ९६

***छात्र प्रबोधन, डोंबिवली विभाग स्थानिक वृत्त***

आम्हा शहरातील मुलामुलींना अशा प्रकारच्या साहससहलीचा अनुभव सर्वस्वी नवीन होता. गरजेचे आणि आवश्यक सामान १२-१५ मैल पाठीवर वाहून नेणे, डोंगरातील वाटा तुडविणे, वाटा शोधताना उडालेली तारांबळ, मुक्कामी पोहोचल्यावर झालेला आनंद, थंडीचा तडाखा, शेकोटीभोवती बसून मारलेल्या गप्पा, म्हटलेली गीते, अशा अनेक गमती-जमती आणि अनुभव नव्यानेच घेत अनोळखी आणि नव्यानेच मैत्री झालेल्यांबरोबर ४ दिवस राहणे असा छानसा कार्यक्रम आठवणींच्या कप्प्यात दडून राहील.

सुरवातीला थोडच्या गोंधळलेल्या मन:स्थितीचा अनुभव, काय करायचे? कसे करायचे? कोणाला विचारावे? रागावणार तर नाहीत ना? मस्ती केलेली चालेल का? कितपत चालेल? अशा शंकाकुशंकांनी थोडी धास्ती घेतलेले आम्ही बरोबरचे काकाच आपल्यापेक्षा जास्त मस्ती करतायत हे बघून मनस्वी खुललो. "काका एकदा मोठ्ठ्याने ओरडा ना!" असा प्रेमळ आग्रह करण्याइतपत ही सलगी एका दिवसात वाढलेली होती.

गडाची उंची ४८०० फूट, कड्यातील अवघड वाट ६-७ किलो ओझे पाठीवर वाहत आम्ही गडावर चढणार का? अशी शंका निघतांना सगळ्याच 'मोठ्या' लोकांना पडली होती. पण न कुरकुरता न कंटाळता आम्ही हे सगळं केलं याचं थोडं आश्चर्य! घरात अजिबात मदत न करणारे आम्ही चक्क आमच्या हाताने शिजवून खातो, हे ऐकून मोठा धक्काच बसला सगळ्या 'मोठ्यांना'.

हरिश्चंद्रगडाने भौगोलिकदृष्ट्या पुणे, नगर आणि ठाणे जिल्ह्याची सीमारेषा आखून दिली आहे. पश्चिमघाटातील सर्वांत रौद्र असा कोकणकडा, मुळ, काळू, पुष्पावती नद्यांचा गडावरून झालेला उगम, उत्तरेला मुळेच्या खोऱ्यापलीकडेपसरलेले 'घनचक्कर', 'कात्रा', 'कळसूबाई' सारखे उत्तुंग डोंगर, पूर्वेला शेजारीच 'कारकोई' आणि 'दादामिया', दक्षिणेला निमगिरीची डोंगर रांग - रांगेपलीकडे 'जीवधन', 'चावई', 'हडसर' 'शिवनेरी'चे दर्शन अशी हरिश्चंद्र-बालाघाटडोंगररांगांची आणि उपरांगांची नैसर्गिक रचना पाहून सगळ्यंनाच सह्याद्रीच्या अवघडपणाची कल्पना आली. नदीच्या खोऱ्यांमध्ये राहणाऱ्या गावकऱ्यांच्या कष्टप्रद जीवनाची थोडीशी झलक पण पाहायला मिळाली. आमची 'ज्यादा-ओझी' घेऊन आम्हाला गडाच्या पायथ्याशी सोडायला आलेल्या मंडळींमध्ये पाचनई गावचे सरपंच पण होते. सरपंच पण थोड्याशा हमालीच्या आशेने ओझी वाहत होते. महाराष्ट्राच्या खेड्यांमध्ये दारिद्र्य किती आहे ह्याची 'चटका' लावणारी जाणीव झाली.

तारामतीच्या शिखरावर बसून चुकत-माकत काढलेला गडाचा नकाशा, आणि पुढे सुधारणा करूच-करू असा केलेला दृढनिश्चय, ही देखील जमेची बाजू.

अशी ही सहल अनेक जाणीवा जागवून गेली.

***कु. शुभदा राजे*** (डोंबिवली)



गाणं म्हणत जगण्यासाठी अन् फुलासारखं फुलण्यासाठी हवं छात्र प्रबोधन हाती.

## गावोगावी साप्ताहिक-पाक्षिक कार्यक्रमांना प्रारंभ

सांगली, सातारा, रत्नागिरी, इचलकरंजी, डोंबिवली, पार्ले, बोरीवली, अलिबाग, औरंगाबाद, धुळे या ठिकाणी साप्ताहिक-पाक्षिक कार्यक्रमांना प्रारंभ झाला. सहभागी होण्यास इच्छुक असलेल्या सभासदांनी कार्यक्रमांचे स्वरूप-वेळ-ठिकाण याबाबत स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधून माहिती घ्यावी व कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे. या व्यतिरिक्त इतर ठिकाणीही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविधांगी उपक्रम सुरू करण्यामध्ये ज्यांना रस आहे व काही वेळ देण्याची इच्छा आहे अशांनी छात्र प्रबोधनच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.

*एप्रिल मे मध्ये होणाऱ्या नेतृत्व प्रशिक्षण शिबिरामध्ये सहभागी होण्याची इच्छा असलेल्या ८ वी ते १२ वी मधील मुलामुलींनी अधिक तपशिलासाठी छात्र प्रबोधनच्या पत्त्यावर लवकर संपर्क साधावा.*

## 'छात्र प्रबोधन' ची स्थानिक कायार्लये

**निगडी** – १) ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी ☎ ८४३८०
**सोलापूर** – ज्ञान प्रबोधिनी, बालविकास मंदिर, डफरिन चौक, सोलापूर. ☎ २५७८२
**सातारा** – १) श्री. सतीश कुलकर्णी, प्लॉट नं. ५१ सर्व्हे नं.३२७/१अ अंजली कॉलनी, करंजे तर्फ. ☎ ५०५०४
**सांगली** – १) श्री. शैलेंद्र केळकर, ६९२ गावभाग, खाडिलकर गल्ली. ☎ ३३१३८२
**कोल्हापूर** – १) डॉ. शुभांगी कुलकर्णी, आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ ☎ ५२१५३४
**इचलकरंजी** – श्री. विनायक गद्रे, वॉर्ड नं. ५, घर नं. ६७ अ, झेंडा चौक, इचलकरंची ☎ ४२४००८
**नाशिक** – १) सौ. साधना गाडगीळ, रामकृष्ण धाम, श्रीरामवाडी, म. गांधी रस्ता. ☎ ५७४८३०
**ठाणे** – १) डॉ. अजित दातार, बी २० अहिल्या सोसा. घंटाळी रस्ता, ठाणे (प.) ☎ ५४२१०८७
**डोंबिवली** – सौ. ज्योती औटी, ३-श्री बिल्डींग, टिळकनगर हायस्कूल जवळ, डोंबिवली (पू.) ☎ ४७४१३९
**बोरीवली** – सौ. अंजली नलावडे, ६/२३५ योगानंद सोसा. वजिरा नाका, बोरीवली (प.) ☎ ८०८५५५०
**रत्नागिरी** – सौ. अंजली कार्लेकर, लक्ष्मीबाई लिमये चाळ, जोशी पाळंद. ☎ २०७२४
**अलिबाग** – श्री. तुषार साखळकर 'सहयोग' श्रीबाग नं २ अलिबाग २४६०३
**धुळे** – सौ. उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरूड बाग, धुळे
**चाळीसगाव** – श्री. विंचुरकर, मुख्याध्यापक, तात्या सामंत माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव
**परभणी** – श्री. दिलीप राके, 'पारस' नाथनगर, परभणी
**लातूर** – डॉ. अरुणा देवधर, विद्यानगर, विवेकानंद रुग्णालय, लातूर. ☎ ४२६१४
**औरंगाबाद** – १) सौ. स्वाती पळसकर, सनी कॉर्नर, दुसरा मजला, पैठण गेट. ☎ २३३२६

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून राष्ट्रीय सौर १० माघ, शके १९१८, ३० जानेवारी १९९७ या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस, पुणे येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले आहे.



सर्वांगीण विकासातून मिळवून देण्या आत्मविश्वास, छात्र प्रबोधन मासिकाचा नित्य असे ध्यास!

# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

(दिल्लीच्या केंद्रीय शिक्षण मंडळाशी संलग्न इ. ५वी ते १०वी मिश्र माध्यमाची शाळा)

## इयत्ता पाचवी प्रवेश चाचणी (१९९७-९८)

(इ. ४थी पर्यंत मराठी/इंग्रजी माध्यमात शिक्षण झालेले विद्यार्थी अर्ज करू शकतात)

प्रवेश चाचणी दि. २ मार्च १९९७ दु. ११ ते ३.

प्रवेश अर्ज दि. १ फेब्रुवारी पासून २० फेब्रुवारीपर्यंत

प्रवेशद्वाराजवळ स्वागत कक्षात दु. ११ ते सायं ८ पर्यंत उपलब्ध

प्रवेश अर्जाची किंमत : प्रत्यक्ष रु. ७०/- पोस्टाने रु. ७५/-

(वसती गृहाची मर्यादित सोय फक्त मुलांसाठी)

संपर्क : ... ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरभाष ४७७६११




– चित्रकार प्रणेश जोशी

पाहिलंत? केवळ भौमितिक आकारातून कसं चित्र साकार होतं ते? आपणही चौकोन–त्रिकोण, वर्तुळ वापरून चित्र काढा आणि पाठवा. उत्तम चित्रांना पारितोषिके दिली जातील.

टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन; PNCW/349, तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. १२८

# विश्वास हा मनीचा

विश्वास हा मनीचा सांगू उभ्या जगाला
आम्ही रवी उद्याचे, अंधार भेदण्याला ।।

अन्याय, भ्रष्टतेला अमुच्या जगी न थारा
जे जे अनाथ त्यांना पंखात द्या निवारा
जाणून [illegible] घेऊ दुःखा कृषीवलांचा
देवत्व त्यात पाहू जो दीन गांजलेला ।।

उधळून मेघ टाकू जलहीन गर्जणारे
घडवू सशक्त बाहू अविराम कष्टणारे
हा कोण? जात कुठली? खोडून छाप सारे
स्नेहार्द्र साद घालू साऱ्याच बांधवांना ।।

उन्मत्त थाप कधि ना ढळवेल निश्चयाला
भुलवील ना धनाची राशी समर्पणाला
वज्रास भेदणारी उभवू अभिन्न हृदये
सामर्थ्य मेळवू या काळास जिंकण्याला ।।

ज्ञानासवेच तोलू विज्ञानस्रोत आम्ही
नवनिर्मितीस लागू स्मरणात ठेवू आम्ही
चारित्र्य शुद्ध भावा फुलवून अंतरंगी
सुकुमार चित्तपुष्पे ही अर्पून मातृभूला ।।

**संपर्क पत्ता :**
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३० ☎ ४७७६९१
**कार्यालयाची वेळ** : स. १० ते संध्या. ७
**या अंकाची किंमत** : रु. ८/-
**वार्षिक वर्गणी** : रुपये १००/-
**प्रकाशन दिनांक** : राष्ट्रीय सौर १० माघ, शके १९१८
३० जानेवारी १९९७